नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु||
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु|| 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२९ गुरुवार, दि. ०३ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# शेतकऱ्यांच्या आडून राजकारण नको


## वित्तमंत्री अजित पवारांनी विरोधकांना सुनावले; शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर विधिमंडळात गोंधळ

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकरी कर्ज माफीचा मुद्दा चांगलाच गाजला. या प्रश्नावर विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. इतकेच नाही तर विरोधक शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला आहे.**

सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी २० हजार कोटी मंजूर करते. पण शेतकरी कर्जमाफी साठी सरकारकडे पैसे नाहीत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. त्याला सत्ताधारी पक्षानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आडून विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी देखील काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या वक्तव्यावरुन कृषिमंत्री आणि लोणीकर यांनी माफी मागण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यासाठी त्यांनी थेट राजदंडला स्पर्श केल्याने अध्यक्षांनी त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले होते. त्यानंतर आता दुसऱ्या दिवशी वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव मांडत शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी केली होती. हा प्रस्ताव अध्यक्षांनी स्विकारला नाही.



राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदती ही सरकार देत नसल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी सरकार २० हजार कोटी मंजूर करतात पण शेतकरी कर्जमाफी साठी पैसे नाहीत का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. सर्व कामकाज बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव फेटाळल्यामुळे विरोधक आक्रमक झाले, शेतकरी प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, चर्चा टाळत असल्याने सरकारचा निषेध करत विरोधकांनी सभागृहाचा बहिष्कार केला.

### सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे

शेतकऱ्यांच्या अडचणींची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. कोणतीही अडचण असो, सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहे आणि राहणार आहे. आम्ही केवळ बोलत नाही, तर प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवतो. शेती ही आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित साधणे, त्यांचे प्रश्न सोडवणे हे सरकारच्या धोरणात सर्वोच्च प्राधान्याने आहे. कोणत्याही परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना एकटे पडू देणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालू नये. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. सरकार चर्चेपासून पळ काढणार नाही, हे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेतंच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. विरोधी पक्षांना त्यांच्या उद्याच्या ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी आहे.

**– अजित पवार, उपमुख्यमंत्री**

# महायुतीच्या घटकपक्षांना समान न्याय देणे ही माझी जबाबदारी

## आ. काशिनाथ दाते; तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत वाघदरा रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्वच घटकपक्षांनी मला निवडून आणण्यासाठी सामुहिक प्रयत्न केल्याची मला जाणीव असून त्या सर्वांना सामावून घेत सर्वांच्या राजकीय इच्छा आकांक्षांना समान न्याय देणे, ही महायुतीचा जबाबदार घटक म्हणुन माझी नैतिक जबाबदारी असल्याचे मत आ. काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील कासारे येथील वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत १० लाख रुपये अंदाज पत्रक असलेल्या कासारे ते वाघदरा रस्ता कामाचे भुमिपूजन व गोवर्धन तथा धनंजय निमसे यांच्या वाढदिवसानिमित्त



आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मांडले. कासारे ते वाघदरा रस्ता कामाचे भुमिपूजन झाल्यानंतर बिरोबा देवस्थानच्या सभामंडपात धनंजय निमसे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला.

आ. दाते म्हणाले की, निश्चितपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रितपणे लढवेल, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे आरक्षण जाहीर होणे बाकी आहे. महायुतीच्या घटकपक्षांच्या वाटाघाटी नेमक्या कशा होतील, हे खात्रीशीररित्या सांगता येत नाही. शिवाय इच्छुकांची संख्याही भरपूर आहे, त्यामुळे आजच एखाद्या कार्यकर्त्याच्या उमेदवारीबद्दल बोलण संयुक्तीक नाही. समविचारी

पान ४

कार्यकर्त्यांनी कुठल्याही एका ठराविक पदासाठी किंवा उमेदवारीसाठी अडून न राहता ज्याला उमेदवारी मिळेल, त्याच्यासोबत एकसंघपणे उभं राहिले पाहिजे. येणाऱ्या काळात प्रत्येकाचं राजकीय व सामाजिक योगदान बघून विविध संस्थावर संधी देत योग्य सन्मान राखला जाईल, त्यामुळे कुणीही नाउमेद होऊ नये किवा नाउमेद करण्याचा माझा हेतूही नाही.

**– आ. काशिनाथ दाते**

# चासनळी श्रीरामसृष्टी नव्या ऊर्जेचे शक्तिस्थळ

## स्नेहलता कोल्हे; रामलल्ला मूर्ती लोकार्पण व 'भारत म्युरल प्लेट्स' कामाचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : रामभक्तांनी मिळून उभारलेला हा उपक्रम संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी आहे. ही श्रीराम सृष्टी अध्यात्मिक चेतनेचे केंद्र ठरणार आहे. प्रभू श्रीराम हे धर्म,कर्तव्य,त्याग, शौर्य आणि सत्याचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन माजी आ. स्नेहलता कोल्हे यांनी केले.



श्रीक्षेत्र चासनळी येथे श्रीराम सृष्टी येथे प्रभू श्रीरामलल्ला मूर्तीचे लोकार्पण तसेच अखंड भारत म्युरल प्लेट्स प्रतिकृती बेस कामाचा शुभारंभ आणि गोदावरी मातेची महाआरती उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाचे उद्घाटन सुदर्शन टीव्हीचे चेअरमन व संपादक धर्मयोद्धा सुरेश चव्हाणके यांच्या हस्ते व मा. आ. स्नेहलता कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी संपूर्ण धार्मिक वातावरणात प्रभू रामलल्लाचे दर्शन, पूजन व आरती विधी पार पडले. चासनळी व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या

पान ४

श्रीरामसृष्टीसाठी विशेष निधी मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यापूर्वीच मागणी केलेली असून त्यासाठी पाठपुरावा देखील सुरू आहे. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्यापासून कोल्हे परिवार आणि चासनळी आणि पंचक्रोशीचे ऋणानुबंध घट्ट आहेत. त्या भावनेतून या सोहळ्याची ऊर्जा अनुभवली आहे.

**– स्नेहलता कोल्हे, मा. आमदार**

# भंडारदरा धरणातून आवर्तन सोडले

## मंत्री विखेंमुळे अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, नेवाशातील गावांना पाणी मिळणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : भंडारदरा लाभक्षेत्राकरीता सिंचन आणि बिगर सिंचनाचे एकत्रित आवर्तन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुचनेनंतर दि. १ जून २०२५ पासून तातडीने सुरु करण्यात आले असून, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची गरज लक्षात घेवून विभागाने तातडीने आवर्तन सोडण्याची कार्यवाही केली आहे.

लाभक्षेत्रात मान्सुनचा पाऊस लांबल्याने शेती तसेच गावागावातील पाणी योजनांना पाण्याचा प्रश्न निर्माण



झाला. या संदर्भात आ. विठ्ठलराव लंघे यांच्यासह श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जलसंपदा मंत्री विखे पाटील यांची मुंबई येथे भेट घेवून आवर्तन सोडण्याची

पान ४

खरीपाच्या पिकांनाही या आवर्तनाचा दिलासा मिळणार असून, काही गावांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर होणार आहे. शेवटच्या गावापर्यंत आवर्तनाचे पाणी मिळण्यासाठी जलसंपदा विभागाने योग्य नियोजन केले असून, कुठेही पाण्याचा अपव्यय होणार नाही. याची दक्षता घेण्याच्या सुचना स्थानिक आधिकाऱ्यांना दिली.

**– स्वपनिल काळे, अभियंता**

# कृष्णा आंधळेला अटक करा

## संतोष देशमुखांच्या भावाचा पोलिस प्रशासनाला इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड** : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा मारेकरी कृष्णा आंधळे मागील २०४ दिवसांपासून फरार आहे. त्याला तत्काळ अटक केली नाही तर आम्ही कठोर निर्णय घेऊ, असा निर्वाणीचा इशारा संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी काल, बुधवारी पोलिस प्रशासनाला दिला.

संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निघृण हत्या झाली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय देशमुख यांचा राईट हँड समजल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक करण्यात आली आहे. पण कृष्णा आंधळे नामक आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागला नाही. तो जवळपास २०४ दिवसांपासून फरार आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी बुधवारी तीव्र रोष व्यक्त केला. तसेच पोलिसांना निर्वाणीचा इशारा दिला. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला ६ महिने लोटले. पण या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. त्याला तत्काळ अटक करा. त्याच्यापासून आमच्या जीवितास धोका आहे. त्याला अटक झाली नाही तर मी लवकरच कठोर निर्णय घेईल. त्यानंतर जे होईल त्याला प्रशासन जबाबदार असेल, असे ते म्हणाले.

स्व. देशमुख प्रकरणाची बीड कोर्टात सुनावणी सुरू आहे. सुनावणीच्या दिवशी आरोपींचे समर्थक व सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी हे पक्षचिन्ह असलेल्या गाड्या मोठ्या संख्येने आणून दहशत पसरवण्याचा व आमच्या कुटुंबावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणातील आरोपींना बीड कारागृहात व्हिआयपी सुविधा मिळत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना वेळोवेळी इतर तुरुंगात हलवण्याची मागणी केली. पण त्यावर काहीही झाले नाही. सर्व आरोपी एकाच जेलमध्ये आहेत. इतर प्रकरणांतील आरोपी तत्काळ जेरबंद होता. पण देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी २०४ दिवसांपासून फरार आहे. त्याचा लवकरात लवकर शोध घ्यावा. आमच्या मागणीची गंभीर दखल घ्यावी, असेही धनंजय देशमुख यावेळी बोलताना म्हणाले.

AMRUTVAHINI Since 1978
DTE CODE EN5162
Hon. Shri. Balasaheb B. Thorat
Ex. Revenue Minister, Govt. of Maharashtra
President, AVS&SVS, Sangamner
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
Sangamner, Dist. Ahilyanagar, Maharashtra 422608
4 Times Accredited by NBA | NAAC A+ Accredited | TUV SUD Certified ISO 9001:2015 | Approved by AICTE | Permanently Affiliated to SPPU,Pune | 'A' Grade Awarded by | Fit 4 Industry Program in Association with TATA TECHNOLOGIES
42 Years of Academic Excellence AVS & SVS
2155+ Campus Placements in last 3 Years
All India 6th Rank in the category of Outstanding Excellence by CSR-GHRDC (2024)
4th Rank in the state of Maharashtra & 6th Rank in the Western Region by CSR-GHRDC (2024)
Foreign Language Center: Learn Japanese | Learn German
Two Times BEST COLLEGE AWARD by SPPU, Pune | BEST PRINCIPAL AWARD by SPPU, Pune (2022-23)
We are happy to inform all stakeholders that our college is now
AN AUTONOMOUS INSTITUTE
(With effective from First Year, Academic Year 2025-26)
Approved by University Grant Commission (UGC, New Delhi) | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
ऑटोनॉमी (स्वायत्तते) ची ठळक वैशिष्ट्ये
- विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत बी. टेक (बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी) पदवी प्रदान केली जाईल.
- उद्योग तंत्रज्ञ, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ, उद्योजक आणि उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील परस्पर सहकार्यामुळे अभ्यासक्रम दरवर्षी अद्ययावत केला जाईल, ज्यामुळे अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेला शैक्षणिक स्वातंत्र्य मिळेल.
- विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय (इंटर डिसिप्लीनरी) ज्ञान आणि कौशल्ये मिळतील.
- विद्यार्थ्यांना उद्योजक, इनोव्हेटर आणि स्टार्ट-अप संस्थापक होण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करून घडवले जाईल.
- उद्योगांशी वाढलेल्या परस्परसंवादामुळे इंटर्नशिप्स, प्रायोजित प्रकल्प, औद्योगिक भेटी आणि ऑन-जॉब ट्रेनिंग प्रोग्राम्सची संख्या वाढेल.
- नियमितपणे सुधारित आणि आंतरराष्ट्रीय दर्जाशी सुसंगत अभ्यासक्रमामुळे जागतिक आव्हाने स्वीकारू शकणारे आणि त्यांना सामोरे जाऊ शकणारे पदवीधर तयार होतील, ज्यामुळे चांगल्या करिअरच्या संधी निर्माण होतील.
- महाविद्यालयाने स्वायत्त अभ्यासक्रमात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एन.ई.पी.-२०२०) मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केली आहेत.
- पालक, विद्यार्थ्यांमध्ये 'अमृतवाहिनी ब्रँड' वृद्धिंगत झालेला आहे.
- अभ्यासक्रमात जपानी आणि जर्मन भाषा समाविष्ट केल्यामुळे जागतिक स्तरावरील प्लेसमेंटच्या संधी वाढतील.
B. Tech | M. Tech | MBA | Ph.D Programs

| B. Tech | DTE Code | Intake |
| --- | --- | --- |
| Artificial Intelligence & Data Science | 516299510 | 120 |
| Civil | 516219110 | 120 |
| Computer | 516224510 | 120 |
| Electrical | 516229310 | 120 |
| Electronics & Computer | 516284410 | 120 |
| E&TC | 516237210 | 120 |
| Information Technology | 516224610 | 120 |
| Mechanical | 516261210 | 120 |
| Automation & Robotics | 516291610 | 60 |

| M. Tech | DTE Code | Intake |
| --- | --- | --- |
| Civil (Stucture) | 516219110 | 06 |
| Computer | 516224510 | 06 |
| Mechanical (Design) | 516261210 | 06 |

MBA (DTE Code : MB5162)

| | | |
| --- | --- | --- |
| Master in Business Administration | 516210110 | 60 |

Ph.D
- Civil Engineering
- Computer Engineering
- Mechanical Engineering

Amrut Meritorious Scholarship for Academic Excellence • Cybage Khusboo, Umang & Cummins Scholarship along with Government Scholarship
Contact: 8669620001 | (02425) 259096/259017/259018 | principal@avcoe.org | www.avcoe.org

# ना. बावनकुळेंचे भाजप कार्यकर्त्यांना भावूक पत्र

## सामान्य कार्यकर्ता म्हणून भाजपात कार्यरत :आपल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : भाजप नेते तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंगळवारी भाजप प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यकाळ संपुष्टात आला. त्यांनी रवींद्र चव्हाण यांच्याकडे आपला पदभार सोपवला. त्यानंतर बावनकुळे यांनी बुधवारी भाजप कार्यकर्त्यांना लिहिलेल्या एका पत्रात एक पायी चालणारा सामान्य कार्यकर्ता ते भाजप प्रदेशाध्यक्ष पदापर्यंत मारलेल्या मजलीवर भाष्य करत कार्यकर्त्यांना पक्षासाठी अविरत कार्य करण्याचा सल्ला दिला. तसेच त्यांच्या सहकार्याविषयी त्यांचे आभारही मानले.



चंद्रशेखर बावनकुळे आपल्या पत्रात म्हणतात, प्रिय कार्यकर्ते बंधू आणि भगिनींनो, आपले मनापासून आभार. कोणती पुण्ये अशी येती फळाला, जोंधळ्याला चांदणे लगडून जावे! या कविवर्य ना. धो. महानोरांच्या कवितेतील ओळींप्रमाणे माझी भावनिक अवस्था झाली आहे. साधारण ३५ वर्षांपूर्वी कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना माझ्यासारख्याच सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मी

पान ४

संपूर्ण प्रवासात पक्षाच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी व आपण सर्व कार्यकर्त्यांनी मला खंबीर साथ दिली, त्यामुळे मी हे शिवधनुष्य पेलू शकलो. या प्रवासात राज्यातील मायबाप जनतेने देखील राज्यातील प्रत्येक ठिकाणी अतिशय आपुलकीने स्वागत केले, प्रेम केले, साथ दिली. आपले हे प्रेम व साथ कायम राहील, याची मला खात्री आहे. राष्ट्रप्रथम, मग पक्ष आणि मग स्वतः हे ब्रीद उराशी बाळगून मी भारतीय जनता पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मागील तीन दशकांपासून काम करतो आहे. आपल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार ! अध्यक्ष म्हणून काम करत असताना अनवधानाने माझ्याकडून काही चुका झाल्या असतील, कोणावर रागावलो असेल तर मी आपणा सर्वांची मनापासून माफी मागतो. आपला लोभ असाच कायम असावा, ही विनंती.

**– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

## संमिश्र

### उत्तराधिकारी बौद्ध परंपरेनुसार निवडला जाईल: दलाई लामा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**धर्मशाळा** : हिमाचलमधील धर्मशाळा येथे बुधवारपासून सुरू झालेल्या १५ व्या तिबेटी धार्मिक परिषदेच्या निमित्ताने दलाई लामा यांनी स्पष्ट केले आहे की दलाई लामांची संस्था भविष्यातही सुरू राहील. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची निवडही तिबेटी बौद्ध परंपरेनुसार केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तिबेट आणि बौद्ध धर्मात चीनचा वाढता प्रभाव पाहता, दलाई लामा यांनी देखील स्पष्टपणे सांगितले आहे की त्यांच्या उत्तराधिकारी निवडीत चीनची कोणतीही भूमिका राहणार नाही. जर चीनने तसे करण्याचा प्रयत्न केला तर ते सहन केले जाणार नाही.

### कोविड व्हॅक्सिनचा अचानक होणाऱ्या मृत्यूंशी संबंध नाही


**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल यांनी त्यांच्या अभ्यासात म्हटले आहे की, देशात हृदयविकाराच्या झटक्याने होणाऱ्या अचानक मृत्यूंचा कोविड लसीशी थेट संबंध नाही. हा अभ्यास १८ ते ४५ वर्षे वयोगटातील लोकांच्या अचानक मृत्यूवर आधारित आहे. आरोग्य मंत्रालयाने बुधवारी एक प्रेस रिलीज जारी करून ही माहिती दिली. या अभ्यासातून भारताची कोविड लस सुरक्षित आणि प्रभावी असल्याची पुष्टी झाली आहे. त्यामुळे होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची प्रकरणे दुर्मिळ आहेत. अभ्यासात असे म्हटले आहे की अचानक मृत्यूची इतर कारणे असू शकतात.

### दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा यांच्या नवीन बंगल्याचे नूतनीकरण केले जाईल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या नवीन सरकारी बंगल्यामध्ये (बंगला क्रमांक १, राज निवास मार्ग) दुरुस्ती आणि सजावटीचे काम लवकरच सुरू होईल. हा बंगला पूर्वी उपराज्यपाल सचिवालयाचे कार्यालय म्हणून वापरला जात होता. आता तो मुख्यमंत्री आणि त्यांच्या कुटुंबाच्या निवासस्थानासाठी योग्य बनवला जाईल. बंगल्यात २४ एअर कंडिशनर, ५ स्मार्ट टीव्ही (चार ५५ इंच आणि एक ६५ इंच), ३ मोठे झुंबर, ८० हून अधिक पंखे बसवले जातील. स्वयंपाकघरात गॅस हॉब, इलेक्ट्रिक चिमणी, मायक्रोवेव्ह, टोस्ट ग्रिल, वॉशिंग मशीन, डिशवॉशर, ५० लिटर प्रति तास आरओ वॉटर प्लांट अशा नवीन मशीन्स असतील.



# ‘सेवा सहयोग’ने फुलविले विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू



जनता आवाज वृत्तसेवा

**अकोले :** पुणे येथील सेवा सहयोग सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दुर्गम आदिवासी भागातील गरजू १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संचचे वाटप करण्यात आले.

आम्ही ज्या मातीत जन्मलो, शिक्षण घेतले व संस्काराचा वसा मिळाला. त्यातून उतराई होण्याचा हा लहानसा प्रयत्न आहे.
**– संजय गंभीरे**

दि.२८ जून २०२५ रोजी सदरचे शैक्षणिक साहित्यांचे अकोले तालुक्यातील पैठण, पैठणवाडी, बुळेवाडी व गंभीरेवाडी तसेच गंभीरवाडी या पाच शाळांमध्ये करण्यात आले.

सदर शैक्षणिक साहित्य किटमध्ये दप्तर, वह्या, कंपास पेटी, पाऊच, चित्रकला वही, सराव पुस्तिका, पेन्सिल, खोड रबर, शार्पनर, पट्टी, कलर खडू व क्रेओन आदी एकूण १३ प्रकारचे साहित्य आहेत. या साहित्याचा शैक्षणिकदृष्ट्या निश्चितच फायदा होणार आहे.

सदर साहित्य हे या भागातील पुणे येथे कार्यरत अधिकारी अनिल गंभिरे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध करून देण्यात आले. सदर साहित्यांचे वितरण पुणे येथील शिक्षण आयुक्तालयातील अधिक्षक संजय गंभिरे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यक दीपक बोऱ्हाडे, शिक्षक लोहरे, वाल्हेकर, कदम, गोंदके व सहशिक्षक बगाड, पथवे, देशमुख, शिक्षिका ताजणे यासह आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# बँकेची प्रगती करुन सभासदांना लाभ द्या

## आ. सत्यजित तांबे; ‘अ.नगर डिस्ट्रिक्ट सेकंडरी’च्या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार



जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** ११ हजार सभासद असून मोठी आर्थिक उलाढाल बँकेच्या माध्यमातून केली जात आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नवीन पॅनल निवडून आला. या नवीन संचालक मंडळाने बँकेची अधिक प्रगती करुन सभासदांना लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील करावे, असे प्रतिपादन आ. सत्यजित तांबे यांनी केले.

अ. नगर डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, अहिल्यानगर च्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आला.

आमदार सत्यजित तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी आ. तांबे म्हणाले की, सहकार व लोकशाहीत जय पराजय होत असतो. ज्याला संधी मिळेल त्याने संधीचे सोन करून संस्था पुढे घेऊन ज्यावी. ही बँक मोठी होण्यामागे सर्व सभासद, संचालक याचे कष्ट आहे. या बँकेची स्थापना मोठ्या मातब्बर शिक्षकांनी केली आहे. त्यांची वाटचाल देखील दैदिप्यमान आहे. बँकेचे कर्ज वाटप ९९५ कोटी रुपयाचे कर्ज वाटप आहे.


यावेळी आ. तांबे यांनी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके यांच्यासह सर्व संचालकांचा सत्कार केला.

बँकेच्या कामकाजाबद्दल माहिती दिली. तसेच सर्व संचालक बँकेच्या हिताचेच निर्णय घेणार आहेत. संस्था टिकली पाहिजे. आमचे संचालक मंडळ हे थोडया दिवसा पूर्वीच सत्तेत आलेले आहे. परंतू मागील काळातील जे काही काम राहिले आहे. हे संचालक मंडळ पूर्ण करणार आहे.
**– आप्पासाहेब शिंदे, चेअरमन**

याप्रसंगी संचालक सुनिल दानवे, उमेश गुंजाळ, महेंद्र, हिंगे, राजेंद्र कोतकर, सुधीर कानवडे, संभाजी गाडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, बाळाजी गायकवाड, छबु फुंदे, साहेबराव रक्टे, शिवाजी लवांडे, बाजीराव अनभुले, अतुल कोताडे, विजय पठारे, सुरज घाटविसावे, बाबासाहेब बोडखे, वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, उध्दव सोनवणे, सचिन जाधव, सचिव स्वप्निल इथापे आदी उपस्थित होते.

# हरिगाव-शिरसगावमध्ये धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद

जनता आवाज वृत्तसेवा



**श्रीरामपूर :** शिरसगाव येथे गेल्या काही वर्षापासून दोन-तीन बिबट्याची दहशत पसरली होती. अनेक वेळा पिंजरा लावला. यावेळी आता वारंवार बिबट्या निदर्शनास आल्याने ८ दिवसापासून पवार व बकाल वस्तीवर पिंजरा लावण्यात आला होता. अखेर या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला.

मनोज बाबासाहेब पवार यांच्या घरापसुन बिबट्याने सोमवारी रात्री एक कुत्रे उचलून नेले होते. त्याची फरपट पाहत मागोवा घेण्यात आला. उसात जाऊन पहिले तर अर्धे कुत्रे आढळले. या आधी भागवत बकाल यांचे गोठ्यातील कुत्रे धरले होते. त्यावरून बिबट्या असल्याचे वाटले.

पिंजरा उपलब्ध होताच लगेच विशाल बकाल, नवनाथ बकाल यांनी ट्रक्टर लावून संजय पवार वस्तीजवळ पिंजरा तेथे नेला व पिंजरा ठेवला. त्यासाठी ओम बकाल, अमोल बकाल, सोमनाथ पवार, शामराव जगताप, प्रतिक बकाल यांचेही सहकार्य झाले.

सोमवारी बिबट्या पिंजराजवळ आला व त्याने पिंजऱ्याजवळ चकरा मारल्या. रात्री ११.३० व बारा वाजेदरम्यान बिबट्या कुत्रे खाण्यासाठी पिंजऱ्यात घुसला अन जेरबंद झाला.

यावेळी वनविभागाला बाळासाहेब बकाल यांनी गणेशराव मुद्गुले यांना कळविल्यावर वनविभाग अधिकारी सकाळी येऊन पिंजरा घेवून गेले. यावेळी हरिगाव-शिरसगाव येथील नागरिक व शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# आत्मा मालिकच्या तनिष्कचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान

जनता आवाज वृत्तसेवा



**कोपरगाव :** येथील आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाच्या आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलाच्या तनिष्क आफळे याने टाटा बिल्डिंग इंडिया निबंध स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले. त्याचा नुकताच राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला टाटा बिल्डिंग इंडियाच्या वतीने पालक दत्तात्रय आफळे यांच्यासह तनिष्क आफळे याला दिल्ली विमान प्रवास, निवास, भोजन, राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे राष्ट्रपतीच्या हस्ते सन्मानपत्र. मेडल, तीस हजारांचे गिफ्ट व्हाउचर देऊन सन्मानित करण्यात आले.

### यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांकडून कौतुक

यशस्वी विद्यार्थ्यांचे परमपूज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपाआशीर्वादासह संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतीगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, वसतिगृह व्यवस्थापिका मीरा पटेल, प्राचार्य निरंजन डांगे यांनी अभिनंदन केले.

टाटा बिल्डिंग इंडिया आयोजित निबंध स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर मराठी भाषेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तनिष्क आफळे यांच्या माध्यमातून आत्मा मालिक शैक्षणिक संकुलाला मिळाली हा अभिमानाचा क्षण आहे, असे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचे सर्वांगसुंदर, सर्वगुणसंपन्न, व्यक्तीमत्त्व घडवण्यासाठी आत्मा मालिक सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी केले.या विद्यार्थ्याला विभाग प्रमुख सचिन डांगे, पर्यवेक्षक गणेश रासने, शिक्षक राजेंद्र जाधव, भैरवनाथ कुंभार, रीना पवार, सुवर्णा ढगे, पंकज गुरसळ, विद्या खोसे, मोनाली गोडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदिपक यश : दिनकर टेमकर

जनता आवाज वृत्तसेवा



**अहिल्यानगर :** कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश नेत्रदीपक असून शिक्षण क्षेत्रातील स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. गवांदे क्लासच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी केले.

विद्यार्थ्यांनी अशीच गुणवत्ता पुढे टिकवावी. परिश्रमाशिवाय यश मिळत नाही. त्यामुळे जिद्द व चिकाटी न सोडता कठोर परिश्रम करून सध्याच्या युवा पिढीने जगापुढे आदर्श ठेवला पाहिजे.
**– प्राचार्य भास्करराव झावरे**

गवांदे क्लासेसच्या १४५ विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ माऊली सभागृहात नुकताच पार पडला त्यावेळी टेमकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तसेच करिअर गायडन्स देखील केले.

या करियर गायडन्स कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते की स्टोन कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे येथील डॉ. संदीप कदम व डॉ. तुषार शिंदे यांनी इंजीनियरिंग प्रवेश प्रक्रिया अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितली. इंजीनियरिंग मध्ये विद्यार्थ्यांना देशात तसेच परदेशात उपलब्ध असलेल्या संधी याबाबत मार्गदर्शन केले.


शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे म्हणाले की, गवांदे सरांनी केलेल्या मदतीमुळे व त्यांच्या शिकवणीमुळे आज मी यशस्वी शिवव्याख्याता म्हणून राज्यात सर्वत्र नावलौकिक मिळवण्यात यशस्वी झालो आहे.

सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गवांदे क्लासेसच्या संचालिका छायाताई गवांदे, युवराज महांडुळे, मोनाली पवार, किशोर गीते, ऋषिकेश गीते आदींनी परिश्रम घेतले.

# विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहिर

जनता आवाज वृत्तसेवा





**श्रीरामपुर :** येथील विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे २०२५ चे राज्यस्तरीय पुरस्कार रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर यांना स्व. ड. रावसाहेब शिंदे स्मृती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार, वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांना प्रख्यात समीक्षक डॉ. र. बा. मंचरकर साहित्यसेवा राज्यस्तरीय पुरस्कार आणि कवयित्री संगीताताई फासाटे-कटारे यांना स्व. पुष्पाताई सुखदेव सुकळे स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले असल्याची माहिती विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे सचिव सुखदेव सुकळे यांनी दिली.

स्व. ड. रावसाहेब यांची ९७ वी जयंती, स्व. पुष्पाताई सुखदेव सुकळे यांचा तृतीय पुण्यस्मरणदिन यानिमित्त सुखदेव सुकळे लिखित ‘ज्ञानदीप’ पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दि. १० जुलै रोजी सकाळी १० वाजता मेनरोड आगाशे सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी. एस. वडजेबापू, प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे, ड. रावसाहेब शिंदे, टी. ई. शेळके, डॉ. राजीव शिंदे आदिंच्या उपस्थितीत होणाऱ्या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन सुखदेव सुकळे, सुयोग बुरकुले यांनी केले.

### ‘विश्वलक्ष्मी’ प्रतिष्ठान स्वखर्चाने कार्यरत

दि. ३० जानेवारी २०१८ पासून सुरू झालेल्या विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे विविध प्रेरणादायी सेवाभावी पुरस्कार, सामाजिक प्रबोधनपर व्याख्याने, पुस्तक निर्मिती, प्रकाशन सोहळे, दुर्बल, निराधार विद्यार्थी यांना गणवेश, वह्या, पुस्तके वाटप, गरजूंना मदत, साहित्य निर्मिती, प्रकाशने अशा विविध स्वरूपाचे सेवाकार्य करणारे विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठान स्वखर्चाने कार्यरत आहे.

# राजाराम नागूल यांचे अल्प आजाराने निधन

जनता आवाज वृत्तसेवा



**अहिल्यानगर :** दातरंगे मळा येथील आगरकरवाडा येथील रहिवासी राजाराम लक्ष्मण नागूल (वय ६०) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्याव नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब नागूल यांचे ते चुलत बंधू होत.

# ‘कृषि’ प्रवेशासाठी लोणीमध्ये सहायता केंद्र सुरु

जनता आवाज वृत्तसेवा



**लोणी :** शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ साठी कृषि व कृषि सलग्न पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी राज्यभर ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. प्रवेश अर्ज करताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणी सामोरे जावे लागते. त्यात प्रामुख्याने ऑनलाईन प्रवेश अर्ज कसा करावा? इच्छुक महाविद्यालयाचा सांकेतांक आणि प्राधान्यक्रम कसा द्यावा? योग्य महाविद्यालय कसे निवडावे? असे अनेक प्रश्न आणि संभ्रम विद्यार्थी तसेच पालक यांच्या समोर असतात.

ग्रामीण भागातील मुलांच्या अडचणी लक्षात घेऊन, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सोईसाठी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, कृषि संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा कृषी शास्त्र संस्था, लोणी या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व सल्ला व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

या केंद्राद्वारे केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरण्याकरिता निःशुल्क सुविधा देण्यात येणार आहे. सदर सुविधा केंद्राचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

### अधिक माहितीसाठी संपर्क करा

अधिक माहितीसाठी कृषी महाविद्यालयचे, समन्वयक प्रा. अमोल खडके (९७६६५६२३३०), कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रा. महेश चंद्रे (७४४८०५९७८८), कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्रा. संतोष वर्पे (७३८७४४२०४६) व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. चंद्रकला सोनवणे (७९७२९९९४६४) यांच्याशी संपर्क करावा.

# युवाशक्ती ही शिवसेनेची खरी ताकद : अनिल शिंदे

## शिवसेनेच्या युवा सेना तालुकाध्यक्षपदी धाडगे; उपजिल्हाध्यक्षपदी भोर

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** शिवसेना पक्षाला युवक मोठ्या संख्येने जोडले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत नवचैतन्य निर्माण झाले असून, राज्यासह जिल्ह्यात भगवे वादळ निर्माण झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गाव पातळीवर पक्ष बांधणी सुरु असून, युवाशक्ती ही शिवसेनेची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी केले.

शिवसेनेच्या युवा सेना तालुका प्रमुखपदी योगेश दत्तात्रय धाडगे व नगर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रामदास भोर यांची नगर तालुका उपजिल्हा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. धाडगे व भोर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख शिंदे बोलत होते.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, संदेश कार्ले, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, बाळासाहेब बोराटे, प्रतीक चौधरी, अमित दळवी, आशिष शिंदे, ओमकार शिंदे, प्रथमेश भापकर, शुभम कावळे, मंगेश दरवडे, विजय दळवी, दीपक झोडगे, सुशील कदम, ऋषिकेश गोंधळे, राजेश धाडगे, रवींद्र धाडगे, राहुल चिपाडे, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भूषण भुजबळ, सोनू बिने, जावेद शेख, बबलू पानमळकर, सोमा धाडगे आदींसह शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकाच डीपीवर अनेक वसाहतीचा भार : कराळे

## नव्या डीपीसाठी महावितरणकडे पाठपुरावा करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांना निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा



**अहिल्यानगर :** केडगावमधील प्रभाग क्र. १६ अंतर्गत येणाऱ्या रभाजी नगर, वैष्णव नगर, भूषण नगर आणि आजूबाजूच्या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिक क्षमतेची नवीन डीपी उभारण्याची मागणी नागरिकांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

भीमाशंकर सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज कराळे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी नुकतीच आमदार जगताप यांची भेट घेऊन वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याचा प्रश्न मांडण्यात आला. यावेळी शारदा राठोड, सुवर्णा वाघ, राजश्री साळवे, मंजू निमसे, संतोष राठोड, प्रकाश चोथे, संध्या अंधारे आदी उपस्थित होते.

रभाजीनगर येथील जुन्या डीपीद्वारे वैष्णव नगर, भूषण नगर आदी भागांना वीजपुरवठा करण्यात येतो. परंतु गेल्या काही वर्षांत या भागात लोकसंख्या आणि घरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, वीज कनेक्शनची संख्या वाढूनही डीपी मात्र जुन्याच क्षमतेची आहे. या वाढलेल्या भारामुळे वारंवार ट्रिपिंग व वीज खंडनाचा सामना नागरिकांना करावा लागत असल्याचे मनोज कराळे यांनी म्हटले आहे.

### आ. जगताप यांनी पाठपुरावा करावा

आ. संग्राम जगताप यांनी विद्युत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करुन संबंधित विभागाला नवीन व अधिक क्षमतेची डीपी लवकरात लवकर उभारण्याच्या सूचना देण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

सद्यस्थितीत ही डीपी अपुरी पडत असल्याने वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांचे रोजचे दैनंदिन काम, विद्यार्थ्यांचे अभ्यास, घरगुती काम करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे. काहीवेळा तर दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी, नागरिकांमध्ये संताप वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ...त्यांनी खोके घेवून मंत्रीपदे बहाल केली

## खा. संदिपान भुमरे; शिरसगाव येथे आ. लंघे यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : आमचे पहिले मुख्यमंत्री केवळ ऑनलाईन दिसत होते. त्यामुळे आम्हाला उठाव करावा लागला. आमच्यावर खोके-बोकेंचा आरोपही झाला. आम्ही मात्र शिवसेनेशी प्रामाणिक राहून हातात झेंडे धरले. केसेस अंगावर घेतल्या आणि सत्ता आल्यावर आम्हाला चांगले मंत्री पद देण्यापेक्षा खोके बहाद्दरांना दिले गेले, अशी खोचक टिका छत्रपती संभाजीनगरचे शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे यांनी उबाठा सेनेचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथे करत चांगलाच हल्लाबोल केला.

आ. विठ्ठलराव लंघे यांना वेळोवेळी मोठी राजकीय संधी आलेली असतांनाही त्यांनी ती सोडून दिल्यामुळे दुसऱ्यांनीच या संधीचा लाभ उठवत या तालुक्याचे आमदार झाले या विधानसभा निवडणूकीमध्ये आ. यांना मिळालेल्या संधीत या निवडणूकीत काहींनी मदत करण्यापेक्षा त्यांना पाडण्यासाठी सुपारी घेवून रिंगणात उतरले? अशी टिका अप्रत्यक्षपणे माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांच्यावर केली मात्र सर्वसामान्य जनतेने विठ्ठलराव लंघे यांना आमदार केले.

**– डॉ. सुजय विखे पाटील**



माझ्या स्वभावात कधीही बदल होणार नाही. सर्वसामान्य जनतेने आणि माझ्या लाडक्या बहिनींमुळे मला ही संधी मिळालेली असून या संधीचे मी सोने करुन जनसामान्यांच्या प्रश्नासाठी सदैव तत्पर राहील. मी तुमच्या सारखाच सर्वसामान्य माणूस असून तुम्ही मला कधीही भेटू शकता, पहील्या आमदारांना भेटण्यासाठी सात पडदे ओलांडून जावे लागत होते. आता मला भेटण्यासाठी अशी गरज भासणार नाही.

**– विठ्ठलराव लंघे, आमदार**

नेवासा तालुक्यातील शिरसगांव येथे काल (दि.२) रोजी नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आ. विठ्ठलराव लंघे यांच्या आयोजित अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, माजी आमदार पांडूरंग अभंग, पंचगंगा उद्योग समुहाचे सर्वेसर्वा प्रभाकर शिंदे, आ. काशिनाथ नवले, सिद्धांत नवले, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, किसनराव गडाख, भाजपाचे नेते सचिन देसरडा, ऋषीकेश शेटे, दत्तु पोटे, हरिभाऊ लंघे, डॉ. तेजेश्री लंघे, शंकरराव लोखंडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश डिके, अंकुशराव काळे, राजेंद्र पोटे, अशोकराव मिसाळ, सुनिलराव वाघमारे, ज्ञानेश्वर पेचे, ॲड. स्नेहल चव्हाण, दादा विधाटे, प्रताप चिंधे, भाऊसाहेब वाघ यांच्यासह आदी उपस्थित होते. खा. भुमरे म्हणाले की, त्यावेळचे ऑनलाईन दिसणारे मुख्यमंत्री कधी आमच्याशी बोललेच नाही. त्यामुळे आम्हाला हा उठाव करवा लागला आणि आमचा उठाव हा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सत्कारणी लागला आहे. मला मिळालेल्या मंत्रीपदाचे सोने करत शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय दिल्याचे आत्मिक समाधान लाभले.

# कीर्तनकार महिलेची हत्या करणारे जेरबंद

## दोन आरोपी गजाआड; परप्रांतिय तरूणांनी केले कृत्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : तालुक्यातील चिंचडगाव येथील कीर्तनकार महिलेच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी मध्यप्रदेशातील दोघांना गजाआड केले आहे. संतोष उर्फ भायला पिता जगण ( रा. राज्य मध्यप्रदेश ह. मु. गाढे पिंपळगाव ता. वैजापूर, अनिल उर्फ हाबडा पिता नारायण विलाला (रा. मध्यप्रदेश) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत.



चिंचडगाव शिवरात शेत गट नंबर ५९ मध्ये असलेल्या सद्गुरू नारायणगिरी आश्रम येथील मोहटा देवी माता मंदिरात चोरी करण्याच्या उददेशाने आलेल्या दोन अज्ञात चोरटयांनी मंदिराचे गेटचे लॉक तोडून मंदिरातील दानपेटी, छोटया मुर्त्या व इतर साहित्य चोरी करून मंदिराजवळच पत्र्याचे शेड बाहेर झोपलेल्या महिला प्रवचनकार किर्तनकार संगीताताई अण्णासाहेब पवार महाराज यांच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना घडली होती. यावरून त्यांचे भाऊ कृष्णा अण्णासाहेब पवार (रा. चिंचडगांव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर) यांचे फिर्यादी वरून गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे व पो. स्टे. विरगांव यांचे पथकास गोपनीय माहिती मिळाली की, नमूद गुन्हयातील संशयीत वर्णनासारखा मिळता जुळता दिसणारा एक इसम गणेश भेळ सेंटर, महालगाव शिवारात फिरत आहे. माहितीची खात्री करणे कामी पो. नि. विजयसिंह राजपूत व सपोनी वाघमोडे, सपोनि पवन इंगळे यांच्यासह पथक रवाना झाले. सदर संशयीत इसमास गणेश भेळ सेंटर महालगाव येथून चौकशी ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने व मित्रांनी मिळून महिलेचा खुन केल्याची कबुली दिली.

प्राथमिक तपासामध्ये नमूद गुन्हा त्यांनी चोरी करण्याचे उददेशाने केला असल्याचे कबूल केले आहे. दोन्ही आरोपीतांना पुढील कायदेशीर कार्यवाही कामी पोलीस ठाणे विरगाव येथे हजर करण्यात आले आहे.

# मुळा धरणातील पाणीसाठा निम्म्यावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : आहिल्यानगरसह राहुरी तालुक्यासाठी लाभदायी असलेले मुळा धरणातील पाणीसाठा निम्म्यावर पोहचला आहे. त्यामुळे शेकऱ्यांसह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. बुधवारी सकाळी धरणातील पाणी साठा १३ हजार दलघफूच्यावर होता.



### शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

जवळपास २० ते २२ दिवसापेक्षा अधिक कालावधी होऊन आता पाऊस थांबलेला आहे. त्यामुळे रब्बी खरीपाच्या पिकांना आता ओढ लागलेली आहे. खरिपाची पिके पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र पावसाने पूर्णपणे दडी मारलेली आहे. धरणाची पाणी परिस्थिती व लाभक्षेत्रातील विहीरीची पाणी पातळी समाधानकारक आहे. मे महीन्यात वीस दिवसाच्या पावसाने काही भागात ओढे, नाले दुथडी भरून वाहू लागले. करपरा, देवनदी या उपनद्या वाहत्या झालेल्या आहेत. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसाने मुळाधरणात सुमारे नऊ दशलक्ष घनफुट पाणी नव्याने आले आहे.

अशी माहिती शाखा अभियंता आर. जे. पारखे यांनी दिली.

गतवर्षी या तारखेला ५९५३ दशलक्ष घनफूट पाणीसाठा होता. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी धरणात ७३२१ दशलक्ष घनफूट पाणीसाठा जास्त आहे. एक जूनला मुळा धरणात ४३३९ दशलक्ष घनफूट पाणीसाठा होता. यावर्षी एक जुलै अखेर धरणात ८९३५ दशलक्ष घनफूट पाणी नवीन आले आहे. गतवर्षी धरणात जून महिन्यात पाण्याची आवक अजिबात नव्हती. गतवर्षी थेट सहा जुलैपासून धरणात नवीन पाण्याची आवक सुरू झाली होती. त्या तुलनेमध्ये धरणाच्या पाण्याची परिस्थिती यंदा समाधानकारक आहे. मात्र मे महिन्यात तालुक्यात सरासरीच्या अनेक पट झालेला पावसानंतर जून महिन्यामध्ये मात्र पावसाने पूर्ण विश्रांती घेतलेली आहे.

# विधानसभेतील लोकप्रतिनिधींचे भाषण टक्केवारीसाठीच

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : विधानसभा सभागृहात संगमनेर मधील अवैध धंद्याच्या संदर्भाने प्रश्न उपस्थित करण्यात आला. मात्र हा प्रश्न अवैध धंदे बंद करण्यासाठी की हप्ते वाढवून घेण्यासाठी? असा प्रश्न संगमनेरकरांना पडलेला आहे.

### संगमनेर मध्ये दबक्या आवाजात चर्चा

गेल्या सहा महिन्यांपासून संगमनेरमध्ये छोट्या मोठ्या कामांमध्ये राजकीय पदाधिकाऱ्यांना टक्केवारी देण्याची पद्धत बोकाळलेली आहे. संगमनेर मधील अनेक कत्तलखाना चालकांकडून मोठ्या प्रमाणावर हप्ते वसुली सुरू असल्याचीही दबक्या आवाजात चर्चा आहे. तथाकथित भावाच्या माध्यमातून व्हाट्सअप कॉलद्वारेही हप्ते वसुली केली जाते. प्रशासनावर दबाव निर्माण करून त्यांच्याकडूनही खंडणी मिळावी या हेतूनेच सभागृहात प्रश्न उपस्थित केल्याचे बोलले जात आहे.

गेल्या सहा महिन्यात संगमनेरमध्ये अवैध धंद्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. पाव बाकी रोड, तीन बत्ती चौक, दिल्ली नाका तेलीखुंट या परिसरात खुलेआम सट्टा आणि जुगार खेळला जातो. भारतीय जनता पक्षाच्या एका नेत्याच्या कुटुंबातील सदस्यांवर याप्रकरणी नुकताच गुन्हाही दाखल करण्यात आला, हा पुढारी कायम नाकाने कांदे सोलण्याचे काम करत असतो. याशिवाय एका सट्टेबाजी प्रकरणात महायुतीचा पुढारी आणि त्याच्या कुटुंबीयांना रंगेहात पकडले गेले. लोकप्रतिनिधी ज्या पक्षातून येतात, त्या पक्षाच्या तालुकाध्यक्षांवर या अगोदर अनेक वाळू तस्करीचे गुन्हेही दाखल झालेले आहेत, आजही राजरोस रात्री अपरात्री वाळू उपसा सुरू आहे.

### कंत्राटदार टक्केवारीला वैतागले

याशिवाय अनेक कंत्राटदारांकडून कामांच्या बदल्यात टक्केवारी गोळा करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान अनेक कंत्राटदारांनी दोन ते पाच लाख रुपयांपर्यंतची रक्कम तथाकथित भावाला दिलेली आहे. मात्र अजूनही काम मिळालेले नाही, झालेल्या कामांचे बिले वेळेत मिळत नाही त्यामुळे कंत्राटदार या टक्केवारीला वैतागलेले आहेत.

# डॉ. तांबे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील रहिवाशी व सध्या कृषि महाविद्यालय, सोनई या ठिकाणी कार्यरत असलेले विद्यार्थी कल्याण तथा क्रीडा अधिकारी डॉ. संदिप कडूभाऊ तांबे यांना 'बी द चेंज' फाउंडेशन, शिर्डी यांच्यावतीने देण्यात येणारा यावर्षीचा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' प्रसन्न पोपटराव पवार व 'बी द चेंज' फाउंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे यांच्या हस्ते शिर्डी येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

डॉ. तांबे यांनी आतापर्यंत केलेल्या शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील केलेल्या कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.त्यांनी आतापर्यंत अनेक विद्यार्थी घडविले आहेत. या पुरस्काराबद्दल मुळा एज्युकेशनचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख, संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख, सुनितताई गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे यांच्यासह अनेकांनी डॉ. संदिप तांबे यांचे अभिनंदन केले.



# 'पुस्तकी शिक्षणाबरोबर संस्कारही गरजेचे'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसावे, तर त्यात नैतिकता आणि संस्कारांचा समावेश असावा. जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, संयम आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयासाठी अविरत मेहनत करून अडचणींवर मात करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना पाथर्डीचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले.

पाथर्डी येथील एकलव्य शिक्षण संस्थेच्या एम. एम. निहाळी विद्यालयात आयोजित इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात पुजारी बोलत होते.याप्रसंगी नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, एकलव्य शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल गुगळे, वैद्यकीय अधिकारी, डॉ. सचिन दरंदले, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, संस्थेचे सचिव डॉ. दीपक देशमुख, संस्थेचे अधीक्षक, शिवाजी बडे,



विश्वस्त श्रीकांत निऱ्हाळी हे उपस्थित होते.

पुजारी म्हणाले,पुस्तकी ज्ञानाबरोबरच आध्यात्मिक शिक्षणाची गरज आहे. संस्कार हे आध्यात्मिक साधनेतून निर्माण होतात. जीवनात ध्येय निश्चित करून कायम या गोष्टीसाठी आपण सातत्यपूर्ण प्रयत्न केले तर कोणतीही अवघड गोष्ट साध्य होऊ शकते, शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी सुसंस्कृतपणा आपल्या ठेवला पाहिजे. गुरुजनाम बरोबर आपल्या आई वडिलांचा सन्मान राखावा असेही आवाहन पुजारी यांनी केले.

# सराईत गुन्हेगारास केले स्थानबध्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भिंगार परिसरात घातक शस्त्र व गावठी कट्टे बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारावर एमपीडीए कायद्यान्वे एक वर्षाकरिता स्थानबद्ध करण्याबाबतची कारवाई करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश पारित केले आहेत.

प्रताप सुनील भिंगारदिवे (वय २९, रा. पंपिंग स्टेशन, सावतानगर, अहिल्यानगर), असे स्थानबद्ध केलेल्या आरोपीचे नाव आहे. प्रताप भिंगारदिवे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात शिविगाळ, दमदाटी करून धमकी देणे, घरात घुसुन महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे, तसेच जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गावठी कट्टा वापरणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

भिंगारदिवे हा सराईत गुन्हेगार याचे समाज विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी एम.पी.डी. ए. कायदयान्वये प्रस्ताव तयार करुन पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांच्या मार्फत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे सादर केला. त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पडताळणी करुन अहिल्यानगर जिल्ह्यातील सार्वजनीक सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता सराईत गुन्हेगार भिंगारदिवे याला स्थानबध्द करणे बाबतचे आदेश दिले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलीस अंमलदार दीपक शिंदे, रवी टकले, संदीप घोडके, प्रमोद लहारे, महादेव पवार, नितीन शिंदे, रेखा पुंड, कविता हरिश्चंद्रे यांच्या पथकाने केली.

# मुख्याध्यापकांची बदली रद्द होण्यासाठी आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : लक्ष्मीभाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकाची बदली रद्द होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसह पालकांचे रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयात दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि. २ जुलै) देखील आंदोलन सुरु होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, यासाठी संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयाच्या आवारातच वर्ग भरविण्यात आले. वडाच्या झाडाखाली भरलेले वर्ग पाहून उपस्थितांना कर्मवीर भाऊरावांच्या आठवणींना उजाळा दिला.

कापड बाजार येथील लक्ष्मीभाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी लंके यांना नुकतीच शाळा सुरु होऊन काही दिवस उलटले असताना त्यांचा अचानक बदलीचा आदेश प्राप्त झाला. आपल्या लाडक्या मुख्याध्यापकाची बदली रद्द होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसह पालकांनी पालक संघ समितीच्या माध्यमातून बुरुडगाव रोड येथील रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. विद्यार्थी व पालकांनी शाळेवर देखील बहिष्कार टाकल्याने शाळा विद्यार्थ्यांशिवाय भरत आहे. वर्गात एकही विद्यार्थी हजर नसल्याने सर्व वर्ग रिकामे पडले आहे.



# श्रीरामपुरात बनावट देशी भिंगरी दारुचा कारखाना उद्ध्वस्त

## १ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल जप्त; तीन आरोपींना अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : भैरवनाथ-नगर (गोंधवणी) परिसरात सुरू असलेल्या बनावट देशी भिंगरी दारुचा कारखाना शहर पोलिसांनी उध्दवस्त केला. या प्रकरणी तिघांना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे १ लाख ६६ हजार ३२० रूपयांचा मुद्देमाल हस्त केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, लता महादू राऊत यांचे मालकीच्या घरामध्ये (कदम वस्ती, भैरवनाथनगर श्रीरामपूर) येथे बनावट देशी भिंगरी संत्रा दारु बनवत आहेत. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने त्यांनी या ठिकाणी पंचासह छापा टाकला असता तेथे आरोपी मोसीन इक्बाल सय्यद (वय २४, रा. संजयनगर पाणी टाकीजवळ वॉर्ड नं.२, श्रीरामपूर), अरबाज अनिस मलंग (वय २५, रा. गुलशन चौक जवळ वॉर्ड नं. २, श्रीरामपूर), अन्वर शब्बीर शहा (वय ४७, रा. संजयनगर डावखर मैदान बर्फ कारखान्याजवळ वॉर्ड नं.१, श्रीरामपूर) हे बनावट देशी भिंगरी संत्रा तयार दारु बॉटलमध्ये भरुन पंच करुन त्याला लेबल लावताना मिळून आले.



पोलिसांनी २८९ बनावट देशी दारु भिंगरी, होन्डा ॲक्टीवा मोपेड गाडी, दारु तयार करण्यासाठी वापरत असलेले स्पिरिट व पाणी मिक्स करुन तयार केलेले रसायन, अर्थ कापलेले निळया रंगाच्या आडव्या टिपाडामध्ये भरलेले जागीच नष्ट केले. दारु भरण्याकरीता भिगरीच्या रिकाम्या बॉटल, झाकण, लेबल, पुठ्याचे पॅकीग बॉक्स, सेलो टेप, सिल पेंकोग मशिन, रब्बर टॅम्प मशिन, प्लॉस्टिक ड्रम, प्लॉस्टिक टिपाड, बनावट देशी भिंगरी संत्रा लेबल, काचेची डिग्री, इलेक्ट्रीक मोटर, प्लास्टिक पाईप असा मुद्देमाल जप्त केला.

### झाकणे शिर्डीतून तर स्पिरीट श्रीरामपुरातून

बनावट दारू सिल करण्यासाठी शिर्डी येथील महेश गाँड ऊर्फ आण्णा रा. शिर्डी (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) येथून आणले. तसेच स्पिरीट व इतर साहित्य प्रमोद बाळासाहेब फुलारे व राहुल बाळासाहेब फुलारे (रा. लोंढे मळा, खबडी जवळ, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर) यांच्या कडुन घेतल्याचे पकडलेल्या आरोपींनी सांगितले. तसेच सदरचे घर हे लता महादु राऊत (रा. वॉर्ड नं. ०२, श्रीरामपूर जि. अहिल्यानगर) यांचे असल्याचे सांगितले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता, जि. अहिल्यानगर
### उपबाजार आवार लोणी खुर्द
### भाजीपाला आवक व बाजारभाव क्विंटलमध्ये

| शेतमालाचे भाव | किमान दर | कमाल दर | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| कांदा | २०० | १२०० | ८०० |
| लसूण | ६००० | ७५०० | ६७०० |
| टोमॅटो | ७०० | १८०० | १२०० |
| हिरवी मिरची | २००० | ३५०० | २७०० |
| शेवगा | ७००० | १०००० | ८५०० |
| भुईमुग शेंगा | ३७०० | ६१०० | ४९०० |
| लिंबू | १५०० | ३५०० | २५०० |

## संपादकीय

# राजभाषा विभागाचे अपयश

देशवासियांना जोडणारी एक भाषा आपण गेल्या ७८ वर्षांमध्ये स्वीकारू शकलो नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे की नाही, यावर वाद घालण्यात आपण धन्यता मानली. नागरिकांना देशात फिरताना अडचण येऊ नये म्हणून देशभर संपर्काची एक भाषा असावी, हे साधे सूत्र आपल्याला अंमलात आणता आले नाही. त्यामुळेच केंद्र सरकारच्या त्रिभाषा सुत्राला अलिकडेच झालेला विरोध राजकीय अस्मितेतून होता, असे म्हणावे लागेल. भाषिक विविधतेच्या तत्त्वाचे समर्थन करून संविधानाने आठव्या अनुसूचीमध्ये २२ भाषांना स्थान दिले आहे. राष्ट्रीय चळवळीतील अनेक नेत्यांनी हिंदीसाठी एक विशेष भूमिका मांडली होती. त्यापैकी बहुतेकांनी आजच्या काळात प्रसारित होणाऱ्या शुद्ध हिंदीऐवजी मिश्रित हिंदुस्तानी भाषेला पाठिंबा दिला; परंतु हे स्पष्ट होते, की ती लादली जाऊ शकत नाही. केंद्र सरकारच्या २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रावरून आता देशभर, त्यातही महाराष्ट्रात वादंग माजले; परंतु १९८६ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीतही त्रिभाषा सूत्राचा समावेश होता, याचा आपल्याला विसर पडला आहे. आज देशात सुमारे ३५ टक्के लोक दररोज कामासाठी स्थलांतर करत आहेत. म्हणूनच आज मोठ्या शहरांसाठी बहुभाषिक ठिकाणे संपवणे आणि एकभाषिक वसाहती मिसळणे योग्य नाही. हिंदी किंवा इंग्रजी या एकाच दुव्याच्या भाषेची कल्पना भारतासाठी आर्थिकदृष्ट्या विनाशकारी ठरेल. यामुळे स्थलांतर कमी होईल आणि भांडवल प्रवाह आटेल. त्या वेळच्या पूर्व पाकिस्तानात बंगाली भाषिकांवर उर्दू लादण्याविरुद्धची भाषा चळवळ पाकिस्तानच्या दोन राष्ट्रांमध्ये फाळणीचे प्रमुख कारण बनली. त्यामुळे भारतातही भाषा लादण्याऐवजी स्वखुशीने स्वीकारली जाईल, यासाठी प्रयत्न करायला हवा. केरळने शेजारच्या राज्यांपेक्षा वेगळी भूमिका घेऊन हिंदीचा केलेला अंगीकार एक आदर्श म्हणून घ्यायला हवा. या प्रयोगामागील भूमिका, त्याचे फायदे-तोटेही समजून घेतले पाहिजेत. कोठारी आयोगाने मांडलेल्या त्रिभाषा सूत्रातील शिफारशीनुसार बिगर-हिंदी भाषिक राज्यांमध्ये सुरुवातीपासूनच हिंदी भाषा लागू करावी आणि हिंदी भाषिक राज्यांनी बिगर-हिंदी भारतीय भाषा सुरू करावी. काही बिगर-हिंदी भाषिक राज्यांनी हिंदी भाषा सुरू केली असली, तरी दुर्दैवाने हिंदी भाषिक राज्यांनी बिगर-हिंदी भाषा शिकवण्याची गरज दुर्लक्षित केली. त्रिभाषा सूत्र हे एक चांगले सूत्र आहे; परंतु भाषेची निवड सरकारवर नाही, तर नागरिकांवर सोपवली पाहिजे. तसेच, भाषा लादण्यापेक्षा राष्ट्रीय एकता वाढवण्याचे मार्ग अवलंबले पाहिजेत. एका राष्ट्रात विविधतेसाठी जागा असली पाहिजे. भारत त्याच्या विविधतेत एक आहे. विविधता ही एक महान तात्विक कल्पना आहे. तिच्याकडे कधीही सांस्कृतिक ओझे म्हणून पाहिले जाऊ नये. संविधान सभेने हिंदीला राजभाषा म्हणून स्वीकारले असेल; परंतु स्वातंत्र्यानंतर लगेचच राजभाषा स्थापन करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करता आला नाही. स्वातंत्र्यानंतर २८ वर्षांनी २६ जून १९७५ रोजी राजभाषा विभागाची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र भारताच्या इतिहासाचा काळा अध्याय म्हणजेच आणीबाणी जाहीर झाली, त्याच दिवशी राजभाषा विभाग अस्तित्वात आला. हा योगायोग म्हणता येईल. तसे, हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे, की भारत हा कदाचित एकमेव देश आहे, जिथे राजभाषेसाठी स्वतंत्र विभाग आहे. राजभाषेच्या अंमलबजावणीसाठी अधिकारी आहेत. जगातील इतर कोणत्याही देशात असे उदाहरण आढळत नाही.

पन्नास वर्षांचा प्रवास पूर्ण करणाऱ्या राजभाषा विभागाच्या स्थापनेचे मूळ उद्दिष्ट राजभाषेशी संबंधित घटनात्मक आणि कायदेशीर नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि केंद्राच्या शासकीय कामात हिंदीचा वापर वाढवणे हे आहे. कोणत्याही विभागासाठी पन्नास वर्षांचा प्रवास कमी नाही. हे खरे आहे की, या काळात हिंदीने मोठा पल्ला गाठला आहे. दळणवळणाची साधने, बाजारपेठ आणि चित्रपट यांनी हिंदीला जगाच्या त्या कोपऱ्यात नेले आहे, जिथे सरकारी पाठिंब्याशिवाय पोहोचण्याची कल्पनाही करता येत नाही. असे असूनही, अलिकडच्या काळात पुन्हा हिंदीविरुद्ध आवाज उठताना दिसून येत आहे. हिंदीच्या समर्थनार्थ चळवळी झालेल्या काही राज्यांमध्ये हिंदीने सर्जनशील कामगिरी केली. मात्र तिथेही हिंदीविरोधी वातावरण पहायला मिळत आहे. महाराष्ट्र हे असेच एक राज्य आहे. महाराष्ट्राला लागून असलेल्या कर्नाटक राज्यातही असेच दिसून आले. कन्नड बोलता येत नसल्याने एका स्थानिक गटाने एका बँक अधिकाऱ्याशी गैरवर्तन केले. सॉफ्टवेअर क्रांतीचे केंद्र असलेल्या बंगळुरूमध्ये हिंदी बोलल्यामुळे उत्तर भारतीयांना ऑटो आणि बाईक चालकांकडून गैरवर्तन सहन करावे लागले आहे. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतर आणि राजभाषा विभागाच्या स्थापनेला ५० वर्षे उलटूनही हिंदी नसलेल्या राज्यांमध्ये हिंदी भाषिकांशी गैरवर्तन होण्याला राजभाषा विभागाचे अपयश कारणीभूत आहे.

राजभाषा विभागाने सरकारी कार्यालयांमध्ये हिंदीमध्ये काम करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी निश्चितच प्रयत्न केले आहेत; परंतु हिंदीबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात त्यांची भूमिका क्वचितच दिसून येते. अर्थात, राजभाषा विभागाच्या लेखी उद्दिष्टात याचा उल्लेख नाही; परंतु राजभाषा विभागालाही या दिशेने काम करावे लागेल. हिंदी भाषिक नसलेल्या राज्यांच्या मनात हिंदीबद्दल निर्माण झालेली गाठ कशी दूर करता येईल याचा विचार करावा लागेल. हिंदी भाषिक नसलेल्या राज्यांचे लोक हिंदीच्या जवळ कसे येऊ शकतात, हे राजभाषा विभागाला पहावे लागेल. ‘हिंद स्वराज’मध्ये महात्मा गांधींनी हिंदीला स्वतंत्र भारताची भाषा मानले होते. त्यांना माहीत होते की तमिळनाडूसारखी हिंदी भाषिक नसलेली राज्ये याला विरोध करू शकतात. म्हणूनच १९१८ मध्ये पाच हिंदी कार्यकर्त्यांना दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रचारासाठी पाठवण्यात आले. त्यांचे पुत्र देवदास गांधी त्यापैकी एक होते. त्यांनी दक्षिण भारतात हिंदीच्या प्रचारासाठी दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा स्थापन केली. यानंतर, केरळ हिंदी प्रचार सभा, राष्ट्रीय भाषा प्रचार परिषद अशा अनेक संघटना स्थापन झाल्या आणि त्यांनी हिंदी सहज स्वीकार्य बनवण्याच्या दिशेने काम सुरू केले. राष्ट्रीय भाषा प्रचार परिषदेचे मुख्यालय महाराष्ट्रातील वर्धा येथे आहे आणि महाराष्ट्रातच हिंदीबद्दल वाद निर्माण होत आहे, हे विडंबन म्हणता येईल.

# वैमानिक पाहावे होऊन!

**खास बात**

**– महेश धर्माधिकारी**



व्यावसायिक पायलट होऊन सर्वोच्च स्थानावर पोहोचण्यासाठी स्टुडंट पायलट लायसन्स मिळवण्यापासून कॅप्टनपदापर्यंत पोहोचण्याचा मोठा टप्पा पार करावा लागतो. या प्रक्रियेत खडतर प्रशिक्षण आणि त्याहूनही खडतर परीक्षा देऊन स्वत:ला प्रत्येक टप्प्यावर सिद्ध करावे लागते. अहमदाबाद विमान अपघाताच्या निमित्ताने पायलट मंडळींचे जोखमीने भरलेले आयुष्य नव्याने समोर आले. त्या निमित्ताने या संपूर्ण प्रक्रियेवर टाकलेला प्रकाशझोत...

अहमदाबाद विमानतळावर झालेल्या विमान अपघातानंतर वैमानिकांच्या एकूणच जीवनशैलीबद्दल अनेकांच्या मनात कुतुहल निर्माण झाले आहे. व्यावसायिक वैमानिक होण्यासाठी नेमके काय करावे लागते, त्यांचे प्रशिक्षण किती काळ चालते, नोकरीच्या वेळा कशा असतात असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. वैमानिकाची नोकरी सर्वसामान्यांना ‘ग्लॅमरस’ वाटते, पण हे ‘ग्लॅमर’ मिळवण्यासाठी त्यांना खूप मेहनत घ्यावी लागते. हे क्षेत्र कर्तबगारी दाखवण्यासाठी आणि समाजात मान मिळवण्यासाठी अगदी योग्य असले तरी त्यासाठी सातत्याने शिकण्याची तयारी, समयसूचकता, यशस्वी होण्याची जिद्द याबरोबरच घरच्यांचा पाठबा आणि आर्थिक पाठबळ या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

सर्व प्रवासी विमानात आसनस्थ झाल्यानंतर त्यांचे भवितव्य त्या विमानाच्या कॅप्टनच्या अर्थात मुख्य वैमानिकाच्या हातात असते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रवाशांबरोबरच अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना सुखाचा प्रवास घडवण्यासाठी या वैमानिकांना मोठ्या दिव्यातून जावे लागते. व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याचा पहिला टप्पा म्हणजे ‘स्टुडंट पायलट लायसन्स’ मिळवणे. हे लायसन्स दुचाकी कवा चारचाकी वाहन शिकण्यासाठी काढाव्या लागणाऱ्या ‘लर्निंग लायसन्स’प्रमाणे असते. बारावीपर्यंत शिक्षण झालेल्यांना हा परवाना मिळवता येतो. त्यासाठी लेखी परीक्षा आणि काही आरोग्य तपासण्यांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागते. या परीक्षा ‘डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन’तर्फे घेतल्या जातात. परवाना मिळवण्यासाठी गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेणे आवश्यक असते. त्यामुळे सध्या तरी शास्त्र शाखेचे विद्यार्थीच वैमानिक होऊ शकतात. मात्र आता ही परिस्थिती बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवाई वाहतुकीचे नियमन करणाऱ्या भारताच्या सर्वोच्च संस्थेने (डीजीसीए - डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन) एक महत्त्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यामुळे आता कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनाही कमर्शिल पायलट परवान्यासाठी प्रशिक्षण घेता येणार आहे. ‘डीजीसीए’ने हा प्रस्ताव नागरी उड्डाण मंत्रालयाकडे पाठवला आहे. मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव कायदा मंत्रालयाकडे जाईल. त्यानंतर अधिकृतपणे लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या नियमाच्या अंमलबजावणीने बारावी उत्तीर्ण, वैद्यकीयदृष्ट्या सक्षम आणि इतर आवश्यक परीक्षा उत्तीर्ण करणारे सर्व शाखांचे विद्यार्थी पायलट प्रशिक्षणासाठी पात्र ठरतील.

‘स्टुडंट पायलट लायसन्स’ मिळाल्यानंतर विद्यार्थ्याला कोणत्याही ‘फ्लाईंग ॲकॅडमी’मध्ये प्रवेश घेता येतो. इथे त्याच्या खडतर प्रशिक्षणाला सुरूवात होते. सुरूवातीच्या क्लासरूम प्रशिक्षणानंतर एकच इंजिन असलेल्या कमी क्षमतेच्या विमानावर त्याचे प्रशिक्षण सुरू होते. अशा विमानउड्डाणाचा सुमारे २० ते ३० तासांचा सराव केला जातो. हा कालावधी विद्यार्थ्याला आवश्यक कौशल्ये आत्मसात करायला लागणाऱ्या वेळेवर अवलंबून असतो. या प्रशिक्षणात ‘क्रॉस कंट्री’, रात्रीचे उड्डाण, विमानातले विविध कंट्रोल्स हाताळणे आदींचा समावेश होतो.

त्यानंतरचा टप्पा म्हणजे ‘प्रायव्हेट पायलट लायसन्स’ मिळवणे. हे लायसन्स मिळवण्यासाठीही विद्यार्थ्याला काही परीक्षा द्याव्या लागतात. लायसन्स मिळवल्यावर त्या विद्यार्थ्याला पाच आसनक्षमता असलेले विमान उड्डाणासाठी दिले जाते. हे विमान उडवण्याचा सुमारे २५० तासांचा अनुभव मिळाल्यावर विद्यार्थी ‘कमर्शियल पायलट लायसन्स’ मिळवण्यासाठी अर्ज करू शकतो. हे लायसन्स मिळवल्यानंतर तो विद्यार्थी नोकरीसाठी एअरलाईन कंपन्या कवा खासगी विमानधारकांकडे अर्ज करू शकतो. पण हा अर्ज करण्यापूर्वी त्याला कमर्शियल विमान उड्डाणाचे वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागते, कारण यापूर्वी त्याने केवळ लहान विमानांवरच प्रशिक्षण घेतलेले असते. आपल्याला वाहन चालवण्याचा परवाना मिळाल्यावर लगेच ट्रक कवा तत्सम वाहने चालवता येत नाहीत तर ही वाहने चालवण्याचे वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागते. त्याप्रमाणेच कमर्शियल विमाने चालवण्यापूर्वी त्याला ‘टाईप रेटग’ करावे लागते. म्हणजे ‘बोईंग ७३७’ कवा ‘एअरबस ए ३२०’ असे विशिष्ट प्रकारचे विमान चालवण्यासाठी आणखी प्रशिक्षण घ्यावे लागते. हे प्रशिक्षण सिम्युलेटरवरच होते. बरेचसे प्रशिक्षण ‘सिम्युलेटर’वर होते. म्हणजे प्रत्यक्ष विमानात न बसता विद्यार्थ्याला विमानातल्याप्रमाणेच सर्व कंट्रोल्स असणाऱ्या मशिनवर प्रशिक्षण दिले जाते.

‘कमर्शियल पायलट लायसन्स’ मिळवेपर्यंत विद्यार्थ्याला प्रशिक्षणावर सुमारे पन्नास लाख ते एक कोटी रुपयांपर्यंत खर्च करावा लागतो. प्रशिक्षणासाठी केलेल्या ॲकॅडमीच्या निवडीवर हा खर्च अवलंबून असतो. प्रत्यक्ष विमानउड्डाण आणि सिम्युलेटर प्रशिक्षण या दोन्ही बाबी महाग असल्यामुळे हा खर्च कोटींच्या घरात जाऊ शकतो. त्यानंतर टाईप रेटगसाठी आणखी दहा लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. त्यामुळे व्यावसायिक वैमानिक होण्याचा मार्ग चांगलाच खर्चिक आहे. बहुतेक वेळा विद्यार्थी यासाठी शैक्षणिक कर्ज काढतात. टाईप रेटग झाल्यानंतरच विद्यार्थ्याला एअरलाईन कवा खासगी विमानधारकांकडे नोकरी मिळू शकते.

एअरलाईन कंपनीत नोकरी मिळाल्यानंतर संबंधित व्यक्ती कॅप्टनपदापर्यंत पोहोचण्याच्या सगळ्यात खालच्या पायरीवर असते. त्याला ‘ज्युनियर फर्स्ट ऑफिसर’ म्हणजेच ‘जेएफओ’ असे म्हटले जाते. या पदावर काही वेळ काम केल्यानंतर म्हणजे विमान चालवण्याचा काही तासांचा अनुभव मिळाल्यावर तो ‘एफओ’ अर्थात ‘फर्स्ट ऑफिसर’ या पदावर पोहोचतो. या पदावर काम करताना विमान चालवण्याचा एकूण १५०० तासांचा अनुभव मिळाल्यावर आणि काही खडतर परीक्षा दिल्यानंतर त्याला ‘एटीपीएल’ अर्थात ‘एअरलाईन ट्रान्सपोर्ट पायलट लायसन्स’ हा परवाना मिळतो. हा या प्रवासातला सर्वात मोठा परवाना आहे. हा परवाना मिळाल्यानंतर संबंधित विद्यार्थी ‘एफओ’ न राहता ‘एसएफओ’ अर्थात ‘सिनियर फर्स्ट ऑफिसर’ बनतो. विमान चालवण्याचा एकूण २५०० तासांचा अनुभव मिळाल्यावर तो कॅप्टन बनू शकतो. अर्थात या अनुभवाचा कालावधी प्रत्येक एअरलाईन कंपनीसाठी वेगळा असू शकतो.

कोणत्याही व्यावसायिक विमानात दोन सीट्स असतात. उड्डाणादरम्यान डाव्या बाजूच्या सीटवर कॅप्टन बसतो, तर उजव्या बाजूच्या सीटवर जेएफओ, एफओ कवा एसएफओ बसतो. कॅप्टन होण्याची प्रक्रियाही सोपी नाही. त्यासाठी त्याला सहा महिन्यांचे खडतर प्रशिक्षण आणि मिळवलेल्या ज्ञानाचा कस लावणाऱ्या परीक्षांना सामोरे जावे लागते. यात सिम्युलेटरवरील प्रशिक्षणाबरोबरच शंभर उड्डाणांच्या प्रशिक्षणाचाही समावेश होतो. कॅप्टन झाल्यानंतर आता त्याला डाव्या सीटवर बसून विमान चालवायचे असते. सुरुवातीला हे सिम्युलेटरवर शिकवले जाते आणि नंतर प्रत्यक्ष उड्डाण केले जाते. हे झाल्यावर त्याला परीक्षकांबरोबर दहा उड्डाणे पूर्ण करायची असतात. कोणत्याही एका परीक्षकाबरोबर त्याला चारहून अधिक उड्डाणे पूर्ण करायची परवानगी नसते. यामुळे त्याची वेगवेगळ्या परीक्षकांकहून परीक्षा घेतली जाते. यात उत्तीर्ण झाल्यानंतर डीजीसीएकडे हा वैमानिक कॅप्टन होण्याच्या योग्यतेचा आहे, असे पत्र पाठवले जाते आणि त्यानंतर त्याला डीजीसीएकडून कॅप्टन म्हणून मान्यता मिळते. कॅप्टन झाल्यानंतर त्याच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांमध्ये मोठी वाढ होते.

वैमनिकांचे आयुष्य खूपच धकाधकीचे असते. त्यांना वेळी-अवेळी उड्डाणासाठी तयार राहावे लागते. अर्थात ‘एफडीटीएल’ म्हणजे ‘फ्लाईंग ड्युटी टाईम लिमिट’नुसार त्यांना दोन उड्डाणांदरम्यान किती विश्रांती मिळावी आणि तीन दिवसांमध्ये, एका आठवड्यात, एका महिन्यात, एका वर्षात जास्तीत जास्त किती उड्डाणे घ्यावीत यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली आहेत. त्यानुसार प्रत्येक वैमानिकाला दर महिन्याचे वेळापत्रक तयार करून दिले जाते. याला ‘रोस्टर’ असे म्हटले जाते. विमानाला उड्डाण घेण्यायोग्य हवामान नसेल, विमान उतरताना धुक्यामुळे कवा इतर कारणांमुळे ते ठरलेल्या विमानतळावर न उतरवता अन्यत्र वळवावे लागले, एखाद्या कॅप्टनला अचानक रजा घ्यावी लागली तर तसेच अन्य काही कारणांमुळे या रोस्टरमध्ये बदल करावे लागतात. एका विमान कंपनीत हजारो वैमानिक काम करत असतात. त्या सगळ्यांसाठी रोस्टर तयार करण्याचे काम अत्याधुनिक सॉफ्टवेअरद्वारे केले जाते. या ग्लॅमरस करियरमागे काही धोकेही आहेत. व्यस्त वेळापत्रक आणि पुरेशा झोपेअभावी वैमानिकांना आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. काही वेळा वैमानिकाला विमान चालवत असताना हृदयविकाराचा झटका आल्याचीही उदाहरणे आहेत. एखादा विमान अपघात झाल्यावर सारासार विचार न करता वैमानिकाची चूक असल्याचा निष्कर्ष काढला जातो. पण बरेचदा ती त्याची चूक नसते तर अपघाताची इतरही काही कारणे असू शकतात.

# तनपुरेवाडी शाळेचे ‘मंथन’ परीक्षेत सुयश

## शिक्षणाधिकारी बुगे व शैलेश मोरे यांच्याकडून विद्यार्थ्यांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** निघोजच्या जिल्हा परिषद शाळा तनपुरेवाडी येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात नवा मानाचा ठसा उमटवत राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अहिल्यानगर येथील द्वारका लॉन्स येथे पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक हे होते. तर शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, व शैलेश मोरे यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या अपूर्व यशामुळे तनपुरेवाडी शाळेचा पारनेर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक पुन्हा एकदा उंचावला आहे. गुणवत्तेची परंपरा जपणारी तनपुरेवाडी शाळा सतत विविध स्पर्धा परीक्षा व उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आहे.

यंदाच्या मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत विशेषतः २ री इयत्तेतील विद्यार्थ्यांनी अतिशय कौतुकास्पद कामगिरी केली आहे. या परीक्षेत अर्णव अंकुश सोनवणे या विद्यार्थ्याने १५० पैकी १५० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, श्रेयश सुरेश गाडिलकर व श्रेयश शंकर मेहेर यांनी १५० पैकी १३४ गुण मिळवून जिल्ह्यात चतुर्थ क्रमांक मिळवला आहे . पार्थ विष्णू सोजे व आरोही संतोष तनपुरे यांनी १५० पैकी १३८ गुण मिळवत जिल्ह्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.



या सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन याच्या जोरावर हे यश मिळवले आहे. शाळेचे मुख्याध्यापक बन्सी गुंड व वर्गशिक्षिका मंगल भुकन यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रोत्साहन दिले. या यशामध्ये शिक्षकवृंद व पातकांचा ही मोलाचा वाटा आहे. या घवघवीत यशानंतर शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व पालकांनी विद्यार्थ्यां बरोबरच व शिक्षकांचे कौतूक केले आहे.

### ... त्यामुळेच राज्य पातळीवर उत्तुंगभरारी

तनपुरेवाडी शाळेमध्ये वर्षभर विद्यार्थ्यांकडून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक दृष्टिकोन रुजवण्यासाठी विशेष उपक्रम राबवले जातात. याचा सकारात्मक परिणाम म्हणून प्रत्येक वर्षी शाळेचे विद्यार्थी जिल्हा व राज्य पातळीवर उत्तुंग यश मिळवत आहेत.

# ‘लायन्स क्लब’च्या अध्यक्षपदी डॉ. आसनानी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सामाजिक कामात कार्यात योगदान देऊन वंचित, दुर्बल घटकांना मदतीचा हात देणाऱ्या लायन्स क्लब ऑफ अहमदनगरची वर्ष २०२५-२६ ची नूतन कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी डॉ. संजय आसनानी, सचिवपदी प्रशांत मुनोत व खजिनदारपदी दिलीप कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली.

लायन्स क्लब ही जागतिक दर्जाची असलेली सेवाभावी संस्था आहे. क्लबचे २१० देशामध्ये १५ लाख सभासदांच्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरु आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात.



कोरोना काळात क्लबने घर घर लंगर सेवेच्या माध्यामातून मोठे कार्य केले, तसेच मागील वर्षी कन्यादान, महिला सक्षमीकरण, युवतींना स्वसंरक्षणाचे धडे व गरजू मुलींसाठी सायकल वाटप आदी उपक्रम राबविले. या उपक्रमाची दखल इंटरनॅशनल लायन्सने घेऊन क्लबला अॅवॉर्डने देखील सन्मान केला आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संजय आसनानी मॅक्सो फेशियल सर्जन आणि दंत चिकित्सक आहेत. मागील २५ वर्षापासून दंत सेवा देत आहे. ते लायन्सचे मागील १६ वर्षापासून सक्रीय सदस्य आहे. यापूर्वी त्यांनी लायन्स क्लबचे जबाबदारीचे पद भूषवले आहे.

सचिव प्रशांत मुनोत उद्योजक असून ते रेल्वे सल्लागार समितीचे माजी सदस्य आहेत. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. दरवर्षाप्रमाणे जूनमध्ये नवीन कार्यकारणी जाहिर करण्यात आली असून, क्लबच्या माध्यमातून सामाजिक उद्दीष्ट समोर ठेऊन वर्षभर सामाजिक कार्य केले जाणार आहे, असेडॉ. संजय आसनानी यांनी सांगितले.

# नवीन वीजरोहित्र बसविण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगावमधील प्रभाग क्र. १६ अंतर्गत येणाऱ्या रभाजीनगर, वैष्णवनगर, भूषणनगर आणि आजूबाजूच्या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिक क्षमतेची नवीन वीजरोहित्र उभारण्याची मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. भीमाशंकर सेवा प्रतिष्ठानचे स्थानिक नागरिकांनी आमदार संग्राम जगताप यांची भेट घेऊन वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याचा प्रश्न मांडण्यात आला. सध्याचे वीजरोहित्रावर विजेचा अधिभार येत असल्याने वीज पुरवठा खंडित होत आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांचे दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळा येत आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## महायुतीच्या घटकपक्षांना समान न्याय देणे ही माझी जबाबदारी

कार्यकर्त्यांनी कुठल्याही अटी-शर्तीशिवाय महायुतीच्या घटकपक्षांमध्ये प्रथमतः प्रवेश करावा, त्यानंतर उमेदवारी चे पाहता येईल . यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबासाहेब खिलारी, दत्ता पवार, सरपंच पंकज कारखिले, पंढरीनाथ उंडे, धनंजय निमसे, बबनराव झावरे, देवराम मगर, जयश्री घोलप, सरपंच सुनिता मुळे, शिवाजी निमसे, अक्षय गोरडे, शुभम टेकुडे, अमोल रोकडे, विकास रोकडे, धोंडीभाऊ दातीर, गोपीनाथ घुले यांसह आदी उपस्थित होते.

आजपर्यंतच्या राजकीय वाटचालीत भुषविलेल्या विविध राजकीय पदांच्या माध्यमातून कासारे गावासाठी सातत्याने निधी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला असून भूमिपूजन केलेल्या १० लाख रुपयांच्या कासारे ते वाघदरा रस्ता कामासाठी पुढील काळात अधिकचा निधी देवून काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन आ. काशिनाथ दाते यांनी दिले.

## चासनळी श्रीरामसृष्टी नव्या ऊर्जेचे शक्तिस्थळ

श्रद्धेने सहभाग घेतला.

मा. आ. कोल्हे यांनी प्रभू रामलल्लाचे दर्शन घेऊन ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या. तसेच, रामभक्तांनी मिळून उभारलेला हा उपक्रम संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. ही श्रीराम सृष्टी अध्यात्मिक चेतनेचे केंद्र ठरणार आहे. प्रभू श्रीराम हे धर्म,कर्तव्य,त्याग, शौर्य आणि सत्याचे प्रतीक आहेत. रामराज्य ही केवळ संकल्पना नाही तर ती एक प्रेरणा आहे.

याप्रसंगी जिल्हा बँक माजी संचालिका चैताली काळे, मनेश गाडे, सचिन चांदगुडे, सरपंच सुनीता बनसोडे, उपसरपंच विनायक गाडे, सचिन राऊत, सोमनाथ चांदगुडे, पंडितराव चांदगुडे, राहुल चांदगुडे आदी उपस्थित होते.

श्रीरामाच्या भक्ति आणि राष्ट्रनिष्ठेची एकत्रित प्रेरणा देणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात विद्यार्थी, ग्रामस्थ, महिला, युवा कार्यकर्ते आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी घेतलेली मेहनत उल्लेखनीय ठरली.

## भंडारदरा धरणातून आवर्तन सोडले

मागणी केली. या संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या आधिकाऱ्यां समवेत चर्चा करुन, लाभक्षेत्रात पाण्याची असलेली वाढती मागणी, शेतीच्या पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तनाचे नियोजन एकत्रितपणे करण्याच्या सुचना दिल्या व याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जलसंपदा विभागाने १ जूलै २०२५ रोजी रात्री सिंचन व बिगर सिंचनाचे एकत्रित आवर्तन सोडण्यात आले आहे.

सिंचन आणि बिगर सिंचनाच्या एकत्रित आवर्तनासाठी भंडारदरा धरणातून १४०० क्युसेस पाणी सोडण्यात आले असून, या आवर्तनामुळे अकोले, संगमनेर, श्रीरामपूर आणि नेवासे तालुक्यातील काही गावांना लाभ मिळेल.

## ना. बावनकुळेंचे भाजप कार्यकर्त्यांना भावूक पत्र

माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. भारतीय जनता पार्टीचा सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भिंती रंगवणे, पत्रके वाटणे, गावोगाव कधी सायकलवर, कधी मोटरसायकलवर, तर कधी पायीच प्रवास करणे इथपासून सुरू झालेला माझा प्रवास भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदापर्यंत येऊन पोहोचला, हे माझ्यासाठीच अविश्वसनीय आहे.

ते पुढे म्हणाले, मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की कधीतरी भारतीय जनता पार्टीचा राज्याचा अध्यक्ष म्हणून आपण काम करू. सामान्यांमधीली असामान्य शक्तींना जागृत करणे हीच तर आपल्या पक्षाची किमया आहे. १२ ऑगस्ट २०२२ रोजी जेव्हा मी पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा आनंद तर होताच पण त्याहून अधिक जबाबदारीचे दडपण होते. अनेक पिढ्यांनी, अतिशय कष्टाने, रक्ताचे पाणी करून राज्यात हा पक्ष उभा केला, वाढवला आणि त्यातून माझ्यासारखे कित्येक कार्यकर्ते घडले. उत्तमराव पाटील, ना. स. फरांदे, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, भाऊसाहेब फुंडकर, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या अनेक मान्यवरांनी जे पद भूषवले, त्या पदाची जबाबदारी स्वीकारणे हे माझ्यासाठी शिवधनुष्य होते. ते शिवधनुष्य समर्थपणे पेलण्याचा मी माझ्या परीने व आपल्या साथीने प्रामाणिक प्रयत्न केला.

# कृषीच्या विद्यार्थ्यांनी ग्रोबॅगमध्ये पिकविला भाजीपाला

## परसबागेसह शहरी भागासाठी महत्वपूर्ण प्रकल्प

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रोबॅगमध्ये दोडका, कारली, घोसाळे आणि भोपळा या पिकांचे योग्य व्यवस्थापन करून भरघोस उत्पादन घेतले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर यांनी दिली आहे.

ग्रोबॅग शेती ही शहरी भागात अत्यंत लोकप्रिय आणि फायदेशीर ठरत आहे. ग्रोबॅगमध्ये योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करुन ताजा आणि सेंद्रिय भाजीपाल्याचे उत्पादन होऊ शकते. सदर प्रकल्प यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आणि राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची दूरदृष्टी व प्रेरणा कार्यरत ठरली. शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञाना पुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असावे म्हणजे विद्यार्थी सैद्धांतिक नव्हे तर व्यवहारिक शिक्षण घेतील या उद्देशाने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी या प्रकल्पअंतर्गत केवळ



विज्ञानाचेच नव्हे तर व्यवस्थापन, जबाबदारी आणि संघटनेचेही धडे शिकत आहे.

सदर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर, प्रा. अश्विनी घाडगे आणि प्रा. प्रेरणा अभंग व इतर सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.

संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी महाविद्यालयाने शिक्षणासोबतच शेतकऱ्यांचे मार्गदर्शक व्हावे या उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम हे पुस्तके ज्ञानाबरोबरच कृषी महाविद्यालयाने सुरू केले आहे या माध्यमातून शेतकऱ्यांना बांधावर जाऊन हे विद्यार्थी मार्गदर्शन करतात. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी नक्षत्र परसबाग या माध्यमातून कोविड काळात सेंद्रिय परसबागेची मोठी जनजागृती महिला बचत गटाच्या माध्यमातून केली आजही अनेक महिला परसबागेच्या माध्यमातून चांगले उत्पादन घेत आहेत. आता ग्रो बॅगच्या माध्यमातून त्यांना ही बॅग जवळपास दोन ते तीन वर्ष वापरता येते.हे नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाल्याने आणि हे तंत्रज्ञान कृषी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिल्याने परसबाग करणाऱ्यांची मोठी सोय या निमित्ताने झाली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना कृषी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून लागवड तंत्रज्ञान, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, मार्केटिंग, ग्रेडिंग, पॅकिंग याचेही ज्ञान संस्थेच्या माध्यमातून मिळत आहे.

# महिलांनी कायद्याविषयी जागृत व्हावे

## न्या. काटकर; कायदेविषयक जनजागृती शिबीर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** महिलांनी कायदे जाणून घेणे गरजेचे आहे. एखाद्या महिलेवर अन्याय होत असेल तर त्या महिलेने कोणताही अन्याय सहन न करता कायद्याचा आधार घेऊन न्याय मिळवला पाहिजे, असे प्रतिपादन ४ थे दिवाणी न्यायाधीश तथा न्याय दंडाधिकारी श्रीमती व्ही. एन काटकर यांनी केले.

तालुक्यातील भैरवनाथनगर ग्राम पंचायत, तालुका विधी सेवा समिती आणि श्रीरामपूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबीर श्रीमती व्ही. एन काटकर यांच्या अध्यक्षतेखाली लोकनियुक्त सरपंच दिपाली फरगडे यांच्या उपस्थितीत पार पडले. त्यावेळी त्या बोलत होत्या. वकील संघाच्या सदस्य अॅड. चित्रा कापसे यांनी घरगुती हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा याविषयी माहिती सांगितली. तसेच वकील संघाच्या सदस्य अॅड. रेश्मा तांबोळी यांनीही कायदेविषयक माहिती सांगितली. सूत्रसंचालन अॅड. मुमताज बागवान यांनी केले.

याप्रसंगी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच चंद्रभागा काळे, ग्रामपंचायत सदस्य कांता शेळके, सीमा शिंदे, बेबी फरगडे, पांडुरंग लबडे, सौरभ गवारे, सुभाष म्हस्के, श्रीमती गायकवाड, अॅड. चंचल सावंत, महिला पोलीस नाईक सविता उंदरे, पोलीस कॉन्स्टेबल सतीश खरात, श्रीमती बीटपल्लीवार, दिपाली किरण फरगडे, संगिता धिवर, यास्मिन बिलाल शेख, अनिता गायधने, तृप्ती जगदाळे, प्रफुल्ला पटारे, रचना फासाटे, तसेच भैरवनाथनगर हद्दीतील बचतगटाच्या महिला उपस्थित होत्या.

# बनावट ॲप प्रकरणी कारवाई करा

## शिंगणापुरात माळवदे यांचे उपोषण सुरु



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शनिशिंगणापूर :** शनिशिंगणापूर येथे बनावट ॲप, बनावट देणगी पुस्तक आदी माध्यमातून झालेल्या करोडो रुपयांच्या घोटाळाप्रकरणी ठोस कारवाई करण्यात यावी यासाठी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे.शनिशिंगणापूर देवस्थान ॲप घोटाळ्याने अडचणीत आलेले आहे. येथील काही कर्मचारी, पुजारी, यांनी देवस्थानच्या अधिकृत ॲप ऐवजी खासगी बनावट ॲप तयार करून, बनावट क्यूआर कोडच्या माध्यमातून, बनावट पावती पुस्तकाच्या माध्यमातून देवस्थानला मिळणाऱ्या देणगीचा मोठा अपहार केला. शनिभक्तांनी दिलेल्या देणगीच्या माध्यमातून प्राप्त देवस्थानचा निधी खासगी खात्यावर वळून घेतला. यामुळे देवस्थानचे मोठे आर्थिक नुकसान झाले तसेच शनिभक्तांची देखील मोठी फसवणूक झाली.याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी पोलीस अधीक्षक, तसेच धर्मदाय उपायुक्त यांच्याकडे तक्रार केली होती. परंतु समाधानकारक कारवाई न झाल्याने संभाजी माळवदे यांनी शनिशिंगणापूर येथे आमरण उपोषण आंदोलनास प्रारंभ केला. माळवदे यांनी देवस्थानने तक्रार केलेल्या तीन बनावट ॲप व्यतिरिक्त इतर सात ते आठ ॲपची चौकशी होणे गरजेचे आहे.

### आंदोलनात यांचा सहभाग

या आंदोलनात काँग्रेसचे संदीप मोटे, महिला काँग्रेसच्या शोभा पातारे, शहर काँग्रेसचे अंजुम पटेल, संजय वाघमारे, संभाजी ब्रिगेडचे शेषराव गव्हाणे, भाजपचे दादा घायाळ, संजय होडगर, कानिफ जगताप, शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे, हरीश चक्रनारायण, सतीश तहऱ्हाळ, विजय गायकवाड, गणपत मोरे आदीसह शनिभक्तांनी सहभाग घेतला आहे.

# श्रीरामपुरात मोफत कॅन्सर तपासणी व्हॅन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे लवकर निदान होण्यासाठी श्रीरामपूर तालुक्यातील नागरिकांसाठी एक सकारात्मक उपक्रम राबवण्यात आला. उपजिल्हा रुग्णालय, शिरसगाव येथे मोफत कॅन्सर तपासणी व्हॅन सेवा उपलब्ध करून देण्यात आली.सदर सेवा तालुक्यात प्रथमच सुरू झाली आहे. उपजिल्हा रुग्णालय समिती सदस्य व माजी नगरसेविक प्रणिती दीपक चव्हाण यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम साकार झाला. या तपासणी मोहिमेस महिलांचा आणि पुरुषांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्तन, गर्भाशय, मुख, तोंड, गळा, त्वचा व पचनसंस्था संबंधित कॅन्सर तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत करण्यात आल्या. तपासणीसाठी कोणतेही शुल्क आकारले गेले नाही.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रणिती चव्हाण आणि डॉ. सुनील गोराणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक परदेशी, डॉ. योगेश बंड, डॉ. काकड, डॉ. आसिफ शेख, डॉ. रविना सांगळे, परिचारिका जमधडे, आरु शेळके तसेच आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तपासणीदरम्यान आरोग्य गोपनीयतेचे पूर्ण पालन करण्यात आले. काही रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शनही करण्यात आले.

# चिकटगाव येथे केला कृषीदिन साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** हरित क्रांतीचे प्रणेते श्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी केली. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्न व खंडाळा येथील श्री साई जनविकास प्रतिष्ठान कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत खंडाळा येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागृती कार्यक्रम कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्न या उपक्रमांतर्गत कृषी दिन साजरा केला.

यावेळी चिकटगाव येथील शेतकऱ्यांना कृषीदूतांनी केले मार्गदर्शन योगेश काळे, उमेश आवारे, सौरभ पवार, आदित्य पवार, कार्तिक भारती, पवन जाधव, आकाश पाटेकर, प्रथमेश विघ्ने व प्राध्यापक जी. व्ही. कांबळे सर यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवनावरती मोलाचे मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन कृषीदूत योगेश नामदेव काळे आणि आभार प्रदर्शन कृषीदूत कार्तिक भारती यांनी केले. यावेळी गावाचे सरपंच बाळू वाघ, माजी सरपंच आर. के. पाटील जि. प. शाळा मुख्याध्यापक बी. के. जाधव तसेच गावातील अन्य शेतकरी उपस्थित होते. चिकटगाव येथे भव्य रॅली काढून 'झाडे लावा झाडे जगवा', 'पाणी आडवा पाणी जिरवा', अश्या घोषणा दिल्या. जिल्हा परिषद शाळा चिकटगाव येथे वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.

# विद्यार्थ्यांमार्फत करणार ५०१ झाडांचे वृक्षारोपण : प्रा. दादासाहेब गोलांडे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** वृंदावन कृषी महाविद्यालय विद्यार्थ्यांमार्फत पाचशे एक झाडांचे वृक्षारोपण करणार असा संकल्प प्रा. दादासाहेब गोलांडे यांनी केला.महानायक वसंतराव नाईक जयंती व कृषी दिन निमित्ताने आयोजित कार्यक्रमात करून महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण पार पाडले. यावेळी ते बोलत होते.वृंदावन कृषी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जयसिंग लामतुळे म्हणाले की, हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणणारे, शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीणारे, शेतकऱ्यांचा जाणता राजा व आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत म्हणून संबोधले जाणारे, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री महानायक वसंतराव नाईक यांच्या सन्मानार्थ प्रत्येक कृषी पदवीध-राणे कृषी दिन हा कार्यालयाबरोबरच थेट शेतबांधापर्यंत सर्वत्र साजरा करावा.कार्यक्रम यशस्वीतेसाठी वृंदावन कृषी महाविद्यालय, गुंजाळवाडी पठारचे प्राचार्य डॉ. रोहित उंबरकर यांनी विशेष प्रयत्न आणि मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी डॉ, योगेश एखंडे, प्रा. आशिष सहाणे, डॉ. नितीन परजने, प्रा. प्रतीक्षा गरजे, प्रा. एस. पी. कारंडे, प्रा. प्रसाद पवार तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कासारे येथे अडीच लाख रुपयांची चोरी

## अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल; तपास सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तळेगाव दिघे:** तालुक्यातील कासारे येथे दिवसाढवळ्या घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा व कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करीत कपाटात ठेवलेले २ लाख ५० हजार रुपये लंपास केले. सोमवारी (दि. ३०) दुपारी १ वाजेच्या सुमारास चोरीची ही धक्कादायक घटना घडली. या घटनेने पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तालुका पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की कासारे येथील अमोल तुकाराम कार्ले (वय ३५) हे सोमवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास घराच्या दरवाजाला कुलूप लावून कुट्टी मशिनमध्ये जनावरांसाठी चारा बारीक करीत होते. दरम्यान ते मोटारचा पान्हा आणण्यासाठी घराकडे गेले असता घराजवळ त्यांना तोंडाला रुमाल बांधलेला एक अनोळखी इसम उभा दिसला. अमोल कार्ले यांनी त्यास तू कोण आहे? इथे काय करतो? असे विचारले असता त्याने आरडाओरडा केला.

दरम्यान तोंडाला रुमाल बांधून घरात घुसलेले दोन चोरटे पळत बाहेर आले. कार्ले यांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यातील एका चोरट्याने त्यांना वीट फेकून मारली व एकाने दगड फेकून मारला. त्यामुळे कार्ले यांच्या डाव्या हाताला आणि डोळ्याजवळ मार लागून ते जखमी झाले. कार्ले यांनी चोरट्यांना अडविण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटे विना क्रमांकाच्या सिल्वर रंगाच्या यूनिकॉर्न दुचाकीवरून पसार झाले. त्यानंतर अमोल कार्ले यांनी बघितले असता चोरट्यांनी घराच्या दरवाजा कडी-कोंयडा उचकटून व कुलूप तोडून आत प्रवेश करीत घरातील सामानाची तसेच कपाटाची उचकापाचक करून कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेली २ लाख ५० रुपयांची रक्कम लंपास केल्याचे लक्षात आले.

### कांदा विक्रीतून आली होती रक्कम

चोरीला गेलेली रक्कम ही कांदा विक्रीतून मिळालेली होती. या रकमेसह काही सोन्याचे दागिने चोरट्यांनी लांबविले, असे अमोल कार्ले यांनी सांगितले. दरम्यान या चोरीच्या घटनेची पोलिसांना माहिती देण्यात आली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे यांनी पोलीस पथकासह तातडीने घटनास्थळी भेट देत माहिती घेतली. याप्रकरणी अमोल कार्ले यांच्या फिर्यादीनुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रोटरी क्लब सेंट्रलच्या अध्यक्षपदी मालकर; सचिवपदी लोढा

**जनता आवाज वृत्तसेवा**





**कोपरगाव :** रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल कार्यकारिणी नुकतीच बिनविरोध पार पडली. यात अध्यक्षपदी डॉक्टर विनोद मालकर आणि सचिवपदी विक्रम लोढा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी सहाय्यक प्रांतपाल रविकिरण डाके उपस्थित होते.यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना नूतन अध्यक्ष डॉ. मालकर म्हणाले की, रोटरीचे कार्य हे सेवाभावी आणि समाज उपयुक्त आहे. येणाऱ्या नवीन पिढीला नेतृत्व कौशल्याचे गुण शिकविण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. रोटरीचे जगाला सर्वात मोठे योगदान म्हणजे पोलिओ निर्मूलन आहे. याच धर्तीवर प्रत्येक समाजासाठी काही ना काही योगदान देण्याचे आमचे प्रयत्न असणार आहे. संजीवनी शैक्षणिक संकुलाचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे आणि विश्वस्त सुमित कोल्हे यांनी संपूर्ण कार्यकारणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. रोटरी सदस्य रोहित वाघ, वीरेश अग्रवाल, अमर नरोडे, डॉ. रावसाहेब शेंडगे, प्रकाश जाधव, डॉ. महेंद्र गवळी, कपिल पवार, हर्षल दोषी, कुणाल आभाळे, इमरान सय्यद, विशाल मुंदडा, रिंकेश नरोडे, सनी आव्हाड,नवनाथ सोमासे, अनुप पटेल, अनूप डागा उपस्थित होते.

# हेरंब कुलकर्णी यांना पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अकोले :** येथील सामाजिक कार्यकर्तेहेरंब कुलकर्णी यांना नागपूर येथील १ लाख रुपयांचा गिरीश गांधी सामाजिक व राजकीय कार्य पुरस्कार जाहीर झाला असून वर्धा येथील सेवाग्राम येथील महात्मा गांधी आश्रमात ६ जुलै रोजी डॉ. अभय बंग यांच्या हस्ते व मीनाक्षी नटराजन (नवी दिल्ली) यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती भारती झाडे व विकास झाडे यांनी दिली.

सी. मो. झाडे फाऊंडेशन नागपूरच्या माध्यमातून चालवण्यात येणाऱ्या सत्यनारायण नुवाल गुरुकुल व्यसनमुक्ती केंद्रातर्फे गिरीश गांधी सामाजिक व राजकीय कार्य पुरस्कार दिला जातो. कुलकर्णी यांनी नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर अनेक सामाजिक कार्यांना वाहून घेतले. त्यांनी एकल महिला, भटके विमुक्त, दारुबंदी, वंचितांचे शिक्षण आणि बालविवाह या विषयांवर लक्षणीय काम केले आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या ८० तालुक्यांमध्ये साऊ एकल महिला समितीचे जाळे उभारले आहे. त्यांच्या कार्यात एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, स्वयंरोजगार सुरू करणे आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदत करणे यांचा समावेश आहे.

या पुरस्कार वितरणानिमित्त मजबुती का नाम महात्मा गांधी नावाचे १०० तरुणांचे २ दिवसांचे वैचारिक शिबिरही आयोजित करण्यात आले असून देशातून अनेक मार्गदर्शक यासाठी येणार आहेत. तसेच हेरंब कुलकर्णी यांची प्रकट मुलाखतही होणार आहे. ज्या महात्मा गांधींच्या प्रेरणेने अंतिम आदमीसाठी काम करावेसे वाटते त्या सेवाग्राम आश्रमात हा पुरस्कार मिळतो आहे याचा आनंद आहे, असे हेरंब कुलकर्णी यांनी सांगितले.

# 'समता पतसंस्थेच्या ठेवीत भरीव वाढ'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या तिमाही आर्थिक स्थितीचा आढावा नुकताच संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी संस्थेचे चेअरमन काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत जाहीर केला. यावेळी संस्थेच्या ठेवी आणि कर्ज वाटपात झालेली उल्लेखनीय वाढ स्पष्ट करण्यात आली.

गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत संस्थेच्या ठेवीत तब्बल १४ टक्के, म्हणजे ३६ कोटी ४४ लाख रुपयांची वाढ झाली असून, १०७३ कोटी २४ लाख इतक्या ठेवी झाल्याची माहिती संचालक संदीप कोयटे यांनी दिली. ठेवीत झालेल्या या भरीव वाढीबरोबरच एकूण कर्ज वाटपामध्ये तीन महिन्यात ४१ कोटी २५ लाख रुपयांची वाढ झाली असून, संस्थेचे एकूण कर्ज वाटप ८०९ कोटी ७९ लाख इतके झाले आहे.



विशेष बाब म्हणजे, गत तीन महिन्यात झालेल्या एकूण कर्ज वाटपापैकी ५४३ कोटी, म्हणजे ६७ टक्के कर्ज सोनेतारण स्वरूपातील असून, एकूण सोनेतारण कर्ज वाटपात गत तीन महिन्यात ४४ कोटी ३६ लाख रुपयांची वाढ झाली आहे. सोनेतारण कर्ज हे जगातील सर्वात सुरक्षित कर्ज समजले जाते. तसेच संस्थेची विविध बँकांमधील गुंतवणूक २५७ कोटी ३८ लाख इतक्या रुपयांची असून, मोबाईल बँकिंग, पेपरलेस बँकिंग, ऑडिट कंट्रोल रूम, सेल्फ बँकिंग प्रणाली, व्हाउचरलेस प्रणाली या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अधिकाधिक वापरामुळे संस्थेच्या समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ९९.८८ ठेवीदारांच्या ५० लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी सुरक्षित झाल्या आहेत, असे संस्थेचेज्येष्ठ संचालक जितूभाई शहा यांनी सांगितले.

### सहकार बास्केट ही संकल्पना राबविणार

समता पतसंस्थेचे सोनेतारण कर्ज व्यवस्थापन हे सुधन गोल्ड लोन या कंपनीमार्फत करण्यात येत असल्यामुळे या कर्ज प्रकारात सुरक्षिततेचा उच्च दर्जा प्राप्त झाला आहे. सुरक्षित कर्ज वाटप, कायदेशीर आणि कठोर वसुली व्यवस्था, तसेच सभासद आणि ठेवीदारांप्रती असलेली पारदर्शकता यामुळे समता पतसंस्थेवरील विश्वास दिवसेंदिवस बळकट होत आहे. संस्थेचे सभासद आणि ग्राहकांसाठी नव्याने सहकार बास्केट ही संकल्पना राबविण्यात येत असल्याचे संस्थेचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी सांगितले.

# जलसंपदा मंत्र्यांकडून तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश

## अखेर भाजपाच्या प्रयत्नांना यश; श्रीरामपूर शहराला पाणी पुरवठा होणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरात गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचे संकट गडद झाले असताना, भाजपच्या सक्रिय पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रीरामपूरला तात्काळ पाणी सोडण्याचे स्पष्ट आदेश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावामध्ये सध्या केवळ एक दिवसपुरेल एवढा पाणीसाठा उरला असून, यामुळे संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण होते. वाढत्या उष्णतेमुळे व पावसाअभावी तलावातील जलसाठा कमी होत गेला असून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे.


ही स्थिती लक्षात घेता, भाजपच्या शिष्टमंडळाने मुंबईतील रॉयलस्टोन निवासस्थानी जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन श्रीरामपूरसाठी तातडीने पाणीपुरवठा सुरू करण्याची विनंती केली.

या शिष्टमंडळात भाजपा अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश सौदागर, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष बंडूकुमार शिंदे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. या मागणीची गांभीर्याने दखल घेत मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांच्याशी थेट संपर्क साधून श्रीरामपूरला तत्काळ पाणी सोडण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यांच्या या तातडीच्या निर्णयामुळे श्रीरामपूरकर नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या शिष्टमंडळाने वेळेवर केलेली ही भेट अत्यंत परिणामकारक ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात असून, जनतेच्या मूलभूत गरजांकडे शासनाचे लक्ष वेधून तातडीने कृती घडवून आणण्यात भाजप यशस्वी ठरल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. शहरामध्ये मागील काही आठवड्यांपासून होत असलेल्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण होते. तलावातील जलसाठा संपत चालल्याने संभाव्य आरोग्यविषयक आणि नागरी अडचणी लक्षात घेता भाजपने हा पुढाकार घेतल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नागरिकांच्या मुलभूत गरजांकडे दुर्लक्ष होऊ नये यासाठी शासन दरबारी एकसंघ स्वरूपात पाठपुरावा करण्यात आला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### पाणीपुरवठा आराखडा तयार करणे गरजेचे

श्रीरामपुराकरांना या निर्णयामुळे तात्पुरत्या स्वरूपात का होईना, श्रीरामपूर शहरातील पाणीटंचाईच्या समस्येवर काही प्रमाणात तोडगा निघाला असून, यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळणार आहे. मात्र, ही समस्या फक्त तात्पुरत्या उपायांनी सुटणार नसून, भविष्यातील गंभीर पाणीटंचाई टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याची गरज अधिक तीव्रतेने अधोरेखित झाली आहे. शासन व स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वयातून आगामी काळात स्थायी स्वरूपाचा पाणीपुरवठा आराखडा तयार करणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.



# १०८ रुग्णवाहिका चालकांचे काम बंद आंदोलन

## शासनाने व बीव्हीजी कंपनीने काम बंद पाडण्याची वेळ आणली असल्याचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यातील १०८ रुग्णवाहिका वाहन चालक गेल्या अनेक वर्षापासून अत्यंत महत्त्वपूर्ण सेवा देत आहे. त्यांच्या समस्यांबाबत १३ मे २०२५ रोजी आझाद मैदान मध्ये आंदोलन करून निवेदन दिले होते त्यावेळी १०८ वाहन चालकांच्या मागण्यांबाबत शासनाने व बीव्हीजी कंपनीने सकारात्मक भूमिका घेऊन न्याय देण्याचे आश्वासन दिले गेले मात्र कोणतीही कारवाई झाली नाही.

राज्यातील १०८ रुग्णवाहिका चालकांचा काम बंद आंदोलन सुरू करून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करताना १०८ रुग्णवाहिका चालक युनियन संघटनेचे अध्यक्ष अशोक कराळे, उपाध्यक्ष अतुल शिंदे, संजय दरवडे, सतीश शिरसाठ, नितीन चेमटे, शरद अस्वर, संजय ओहोळकर, राहुल वाकचौरे, वाल्मीक शितोळे, संतोष चौधरी, भीमराज मोकाटे, जगन्नाथ खेमनार, आप्पासाहेब झुंबड, किशोर घनवट, सुनील देशमुख, सोमनाथ बांडे आदीसह चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सेवा पुरवठा बीव्हीजी कंपनी कडून कुठलाही प्रतिसाद मिळत नाही. चालक संघटनेने ही सेवा बीव्हीजी कंपनी यांना निवेदन देऊन चर्चा करण्याची विनंती केली होती. १५ जून पर्यंत चर्चा करून मागण्याचे पूर्तता न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ही देण्यात आला होता. परंतु १०८ वाहनचालकांच्या मागण्यांबाबत कुठली हालचाल करण्यात आली नाही. त्यामुळे रुग्णवाहिका चालकांमध्ये तीव्र असतो निर्माण होऊन त्यांच्या अल्प वेतनावर त्यांना काम करावे लागते.

या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय रुग्णवाहिका चालक युनियनने घेतला असून लवकरात लवकर मागण्या मान्य करण्यात यावे, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय करावा

रुग्णवाहिकाची अवस्था अत्यंत वाईट असून रुग्णवाहिकाला आग लागून रुग्ण व वाहनचालकाचा जीवितास धोका निर्माण होईल अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहे व वाहनचालकाकडून ज्यादा काम करून घेतले जाते परंतु त्यांना कुठलाही मोबदला दिला जात नाही, या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.




# श्रीरामपुरात ६३ रक्तदात्यांनी केले रक्तदान : उद्धव तांबोळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** १ जुलै जागतिक रक्तदान दिनानिमित्त रोटरी क्लब, इनरव्हिल क्लब, इंडियन मेडिकल असोसिएशन, इंडियन डेंटल असोसिएशन, सिए असोसिएशन, श्रीरामपूर सायकलिंग क्लब, श्रीरामपूर आर्किटेक अँड इंजिनीअर्स असोसिएशन, ओरिएंटल इन्शुरन्स कं. लि. व नित्यसेवा ब्लड बँक श्रीरामपूर यांच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरस ६३ रक्तदात्यांनी रक्तदान केले असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष उद्धव तांबोळी यांनी दिली.

जागतिक रक्तदान दिनानिमित्त १ जुलै रोजी आझाद मैदान आगाशे सभागृहात सकाळी दहा वाजता रक्तदान शिबीराचे उप प्रादेशिक वाहन अधिकारी अनंता जोशी यांच्या हस्ते रक्तदान करून शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी संदीप शहा, रोटरी क्लबचे मावळते अध्यक्ष अजित घोगरे, सचिव सरबजीतसिग चुग, इनरव्हिल क्लब अध्यक्ष शितल भुतडा, सेक्रेटरी नम्रता मुंदडा, अशोक गाडेकर, प्रकाश कुलथे, डॉ. अतुल करवा, सेक्रेटरी डॉ. संकल्प शिरसाठ, डॉ. दिलीप शेजवळ, डॉ. तौफिक शेख, सायकलिंग असोसिएशन अध्यक्ष संकेत यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी काम पाहिले.




# ... अखेर २० वर्षानंतर सुटला पाण्याचा प्रश्न

## अनिल शिंदेंच्या पुढाकाराने महिलांच्या डोक्यावरचा हंड्यांचा भार झाला कमी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तब्बल २० वर्षांपासून इंगळे वस्ती आणि पंचशील वाडी परिसरातील नागरिकांना भेडसावत असलेला पाण्याचा गंभीर प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. माजी नगरसेवक व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांच्या प्रयत्नातून या भागात नव्या पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले असून, नागरिकांच्या घरापर्यंत पाणीपुरवठा सुरू झाला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या महिलांच्या डोक्यावरचा हंड्यांचा भार कमी झाला आहे.

इंगळे वस्ती व पंचशील वाडी या भागातील नागरिकांना मागील १५ ते २० वर्षांपासून पाण्याच्या तुटवड्याचा सामना करावा लागत होता. या भागात पाईपलाईन नसल्यामुळे महिलांना आणि लहान मुलांना लांब अंतरावरून पाणी आणावे लागत होते. अनेक वेळा स्थानिकांनी तक्रारी करूनही यावर ठोस उपाययोजना झाल्या नव्हत्या. मात्र, माजी नगरसेवक अनिल शिंदे यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत निधी उपलब्ध करुन पाईपलाईन टाकून दिली.

केडगाव येथील मुख्य पाण्याच्या टाकीतून या भागासाठी विशेष पाईपलाईन टाकण्यात आली आहे. या कामाची पाहणी करून पाईपलाईनचे वॉशआऊटही करण्यात आले. काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांच्या घरा समोर प्रथमच पाईपलाईनद्वारे पाणी येऊ लागले.

यावेळी माजी नगरसेवक अनिल शिंदे, प्रशांत गायकवाड, दीपक खैरे, मनपाचे अभियंता गीते, ठेकेदार मोडवे, अक्षय कोंडवार, आकाश निर्भवणे, आशिष शिंदे, ओंकार शिंदे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्न सुटल्याने महिलांसह नागरिकांनी आनंद व्यक्त करत अनिल शिंदे यांचे विशेष आभार मानले.



प्रभाग क्र. १५ मधील विविध नागरी प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त करुन प्रभागातील विकास कामे मार्गी लावण्यात आली. कामाचे नियोजन करुन प्रभागातील सर्व मुलभूत प्रश्नांना प्राधान्य देण्यात आले आहे. या भागातील महत्त्वाचा पाणी प्रश्न कायमचा सुटणार आहे.

**– अनिल शिंदे, माजी नगरसेवक**

# पोलीस कर्मचाऱ्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अकोले पोलिस स्टेशनला कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी किशोर लक्ष्मण तळपे (वय ४०) यांचे हृदय विकाराने निधन झाले. दि. ३० जुन रोजी त्यांच्यावर डोळासणे येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

तळपे अकोले पोलिस स्टेशनला गेली चार वर्षापासून कार्यरत होते. ब्राम्हणवाडा बीटचे अमलदार पोलिस कॉन्स्टेबल किशोर तळपे हे दि. २९ जून रोजी ड्युटीवर असताना दुपारी त्यांना हृदय विकाराचा झटका आला. यावेळी सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांना तात्काळ भांडकोळी हॉस्पिटल येथे नेले. मात्र उपचारापुर्वीच त्यांचे निधन झाले.

घटना समजताच उपविभागीय पोलिस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी रुग्णालयात भेट दिली. कै. किशोर तळपे हे डोळासणे येथील रहिवासी होते. अतिशय शांत, संयमी व कर्तव्यदक्ष पोलिस कॉन्स्टेबल म्हणून परिचित होते. त्यांच्या अचानक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कॉन्स्टेबल म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला होता. अकोल्यात येण्यापूर्वी त्यांनी राजुर पोलिसात काही वर्ष काम केले. आपल्या वडिलांच्या निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर त्यांना नोकरी मिळाली होती. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा आहे. अत्यंत शोकाकुल वातावरणात सलामी देत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

यावेळी पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, अकोल्याचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, अकोले शहर, संगमनेर शहर राजूर पोलीस तसेच राजकीय, सामाजिक, शिक्षण, आदि क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.






# शिलाविहारला आजपासून गुरुपौर्णिमेचा सप्ताह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरात शिला विहारला श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपोर्णिमेचा अखंड हरिनाम सप्ताह गुरुवारपासून प्रारंभ होत आहे. आज, ३ ते १० जुलैपर्यंत या सप्ताहात भागवत कथा होणार आहे.



या अखंड हरिनाम सप्ताहात २४ तास श्रीराम जय राम जय जय राम हा जप सेवाभावी मंडळाचे सदस्य करणार आहेत. भाविकांना श्री. गोंदवलेकर महाराज यांचे चरित्र ग्रंथाचे वाचन करायचे असेल त्यांनी सकाळी ९ ते ११ या वेळेत पारायण सोहळ्यास उपस्थित राहावे.

ज्या भाविकांना ग्रंथ पाहिजे त्यांनी विजय मते यांच्याशी संपर्क करावा. व्यासपीठ चालक मनीषा भोंग आहेत. या पारायण सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन हभप सुंदरदास रिंगणे यांनी केले आहे.

या सप्ताहामध्ये पुणे येथील भागवत कथाकार विनायक पारखे शास्त्री कथा निरूपण करणार आहेत.३ जुलै ते १० जुलै पर्यंत गोंदवलेकर महाराज मंदिरात दर एक तासाने भाविक नामजपास बसतील पहाटे ५ ते ७ रुद्राभिषेक, सकाळी ९ ते ११ ग्रंथ वाचन, ११ ते १२ भजन दुपारी १२:३० वाजता आरती होऊन दुपारी २पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

दुपारी ३ ते ६ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० पंचपदी भजन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. तरी भाविकांनी या सर्वांचा लाभ घ्यावा, असे हभप रेखाताई रिंगणे यांनी सांगितले. १० जुलै रोजी सकाळी ९ ते ११ हभप किशोर महाराज कोकाटे यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.

# मेहेरबाबा नगर सेंटरचा वर्धापन दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर केंद्राचा ६६ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमाने उत्साहात संपन्न झाला. यावेळी सेंटरचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी, दीपक थाडे, नितीन थाडे, मधुकर डाडर व परिवार, नीलिमा औटी, मेहेर भुज्जी, संतोष पाटसकर, श्रुती मुळे, जोशी आदींसह मोठ्या संख्येने भाविक व नगरकर उपस्थित होते.

यावेळी मेहेरप्रेमींनी बाबावरील भजन, आरती, प्रार्थना, सुगमसंगीत गायन, शास्त्रीय व भक्तीगीत गायन, वादन, कव्वाली गायन, भजने व अभंग वाणी तसेच नृत्य सादर केले.

डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी यावेळी सेंटरची स्थापना व बाबाच्या कार्याविषयी माहिती दिली. ते म्हणाले बाबाचे जगात सेंटर होते. पण नगरमध्ये नव्हते. तेव्हा मेहेरबाबानी सेंटर स्थापन करण्याची सूचना केली. मग मेहेरप्रेमींच्या घरी दर शनिवारी सेंटर सुरु करावयाचे ठरले. मग आदी इराणी याना जागा मागण्यात आली. त्यांनी सरोष पेट्रोल पंपाशेजारील या जागेतील एक खोली दिली २९ जूनला सेंटर भरून पहिला प्रोग्राम झाला व सेंटर सुरु झाले. यानंतर आरती प्रार्थना करण्यात आली व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कलाशिक्षक संघटनेला १८ वर्षांची उज्ज्वल परंपरा

## पारनेर तालुका कलाशिक्षकच्या अध्यक्षपदी गायकवाड, तर सचिवपदी कवडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुका कलाशिक्षक संघटनेची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून पारनेर तालुका अध्यक्षपदी कानिफनाथ गायकवाड, सचिव पदी ज्ञानेश्वर कवडे, कार्याध्यक्षपदी साहेबराव घुले यांची निवड करण्यात आली आहे.

पारनेर तालुका कला शिक्षक संघटनेची बैठक जिल्हाध्यक्ष संजय पठाडे यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर येथे घेण्यात आली.

या बैठकीत तालुका अध्यक्षपदी कानिफनाथ गायकवाड, सचिव ज्ञानेश्वर कवडे, कार्याध्यक्ष साहेबराव घुले, उपाध्यक्ष विश्वनाथ धुमाळ, शैलेश ठुबे, कोषाध्यक्ष शरद आंधळे, सहसचिव नवनाथ झावरे, महिला विभागप्रमुख प्रतिभा फलके यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

या बैठकीला रवींद्र गायकवाड, मंगेश काळे, आबासाहेब गाडे, नारायण शेळके, संतोष कवडे, संजय घोडके, कलाश्रुती वाळुंज, मिरा पुजारी, शितल आंधळे, रविदास भालेराव व इतर कला शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीचे सूत्रसंचालन नूतन सचिव ज्ञानेश्वर कवडे यांनी केले. तर आभार नूतन तालुकाध्यक्ष कानिफनाथ गायकवाड यांनी मानले.

कलाशिक्षक संघटनेच्या तालुका सचिवपदी निवड झालेली प्रसिद्ध कला शिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांचे अक्षर गणेश व इतर कलाकृती अत्यंत प्रसिद्ध असून ते एक नावाजलेले कलाकार व कलाशिक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. पारनेर तालुक्यात प्रसिद्ध कला व वृक्षप्रेमी म्हणून ओळखले जाणारे सेवानिवृत्त कलाशिक्षक रामदास कवडे यांचे ते सुपुत्र व प्रसिद्ध कलाशिक्षक संतोष कवडे यांचे छोटे बंधू आहेत.



# स्व. नाईक रोजगार हमी योजनेचे जनक : मुंडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** हरित क्रांतीचे प्रणेते, समाजसुधारक वसंतराव नाईक यांनी १९६३ ते १९७५ पर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम करत राज्याच्या सर्वांगीण विकासामध्ये दिशा दिली. वसंतराव नाईक हे एक प्रसिद्ध कृषीतज्ज्ञ आणि प्रगतीशील शेतकरी होते. वसंतराव नाईक हे शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दल केवळ जागरूक नव्हते, तर त्यांनी दूरगामी उपाययोजनाही केल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांचे नाते नेहमीच दृढ होते. कठीण काळातही नाईक यांनी क्रांतिकारी काम केले. म्हणूनच त्यांना शेतकऱ्यांचा राजा आणि हरित योद्धा म्हटले जाते, असे प्रतिपादन मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, सोनू चौधरी, राहुल सूर्यवंशी, राजेश कार्ले, सुनील म्याना,अजित दळवी, रामनाथ माने, राजू दळवी, यूनुस शेख, अक्षय घोडके आदी उपस्थित होते.



# कोपरगाव शहर व तालुक्यात विशेष पथकाची कारवाई

## १४ लाख १३ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त ; २५ आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरसह तालुक्यांमध्ये सध्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये अवैध धंद्याचे कर्दनकाळ ठरलेले प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांनी व त्यांच्या विशेष पथकाने काल मंगळवार १ जुलै रोजी कोपरगाव शहर व तालुक्यातील येसगाव या ठिकाणी अवैध मटका जुगार यांच्यावर धडक कारवाई करत सुमारे १४ लाख १३ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल व २५ आरोपी आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली सविस्तर माहिती अशी की, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांनी कोपरगाव तालुक्यातील येसगाव येथील मटका अड्ड्यावर छापा टाकत सुमारे ११ लाख १९ हजार २३० चा मुद्देमाल व १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर पोलिसांची चाहुल लागताच चार आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले आहे. प्रवीण दत्तात्रय आहेर, देवा काशिनाथ पुरे, युवराज भगवान शिंदे, दिलीप चिमाजी गायकवाड, प्रवीण भाऊसाहेब डोखे, जनार्धन रामदास खलसे, हिरालाल यादव चंद्रा, राजेंद्र गंगाधर सोनगिरे, मारुती सुखदेव जाधव, शिवाजी छबू आहेर, संजय पोपट




मोरे, वाल्मीक रंगनाथ पर्वत, जितेंद्र बळीराम पहिलवान, संतोष चांगदेव साताळकर, प्रवीण ठकाजी खोकले, विकास एकनाथ घोडेराव, रवींद्र सूर्यभान उशीर, बबलू माधव सानप, बापू अशोक पवार (सर्व जण राहणार येवला ता. नाशिक) असे आरोपींची नावे आहेत.

### स्थानिक पोलिस केवळ नावासाठी

दरम्यान यात प्रामुख्याने सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, सुमारे शंभर किलोमीटर वरून अहिल्यानगरच्या विशेष पथकाची कारवाई एवढ्या मोठ्या प्रमाणात होत असेल तर स्थानिक शहर पोलीस स्टेशन व त्यातील संबंधित अधिकारी काय करतात? हा प्रश्न यामुळे मोठ्या प्रमाणात जागरूक नागरिकांमधून उपस्थित होत आहे. यामध्ये स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक तडजोड होती का असा देखील प्रश्न यामुळे उपस्थित झाला आहे. आता तरी स्थानिक पोलीसप्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांचे डोळे उघडतील का ? की पुन्हा अवैध व्यवसायिकांचे व्यवसाय आर्थिक तोडजोडी अंती सुरू राहतील ? हा खरा प्रश्न आता कोपरगावकरांना पडला आहे.

कोपरगाव शहरातील रवींद्र ढोक व शंकर वाणी या मुख्य म्होरक्यांच्या मुसक्या आवळत ६ जण ताब्यात घेतले आहे. तर या कारवाईत २ लाख ९४ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

शंकर वाणी, रवींद्र ढोक, गणेश लकारे, संतोष चवंडके, स्वप्नील घुमरे, इस्माईल शेख (सर्व जण राहणार कोपरगाव) या कारवाईमुळे कोपरगाव शहरासह तालुक्यातील अवैध व्यवसाय करणाऱ्याचे धाबे दणाणले आहे. संतोष खाडे यांनी अवैध व्यवसाय विरुद्ध मोठ्या प्रमाणात कंबर कसली असून त्यांचे नाव ऐकले तरी अवैध व्यवसायिकांना धडकी भरत असल्याची चर्चा जिल्ह्यांमध्ये होतीच परंतु कोपरगाव शहरांमध्ये मंगळवारी सायंकाळी झालेल्या कारवाईमुळे त्यांच्या या छबीला दुजोरा मिळाला आहे.

# कोपरगाव परिसरात पावसाची दडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीपाची पेरणी उरकली, परंतु पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. नुकतेच उगविलेले पिके सुकू लागली आहेत. पाऊस कधी येतो यासाठी शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागून आहेत.



तालुक्यात मे महिन्यातच बरा पाऊस झाला. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा पाऊस झाल्यावर शेतकऱ्यांनी पेरण्या उरकविल्या. दरवर्षीच्या तुलनेत या परिसरात सोयाबिनचे क्षेत्र कमी होऊन मका पिकाचे क्षेत्र वाढले आहे. सोयाबिनला मिळणारा अत्यल्प भाव यामुळे नेहमी सोयाबिनचे पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी मका पेरणीला प्राधान्य दिले आहे. सध्या दुपारी पडणाऱ्या उन्हामुळे पिके चांगलीच सुकू लागली आहेत.

चार-पाच दिवसात पाऊस झाला नाहीतर शेतकरी संकटात सापडणार आहे. शेतकऱ्यांनी योग्य साठवणूक केलेले, उगवण झमता तपासलेले घरगुती बियाणे बिजप्रक्रिया करून पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभाग देत आहे. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सल्ल्यानुसार उगवण क्षमता तपासली, बिजप्रक्रिया केली, मात्र तरीही अनेक शेतकऱ्यांना यावर्षी मोठा फटका बसला असून घरगुती बियाणाची उगवण झाली नाही. सोयाबिनची उगवण झमता ही बारदाणात टाकून केली जाते. त्या बियाण्याचा ९० टक्के पेक्षा जास्त उतार झाला, मात्र प्रत्यक्षात शेतात बियाण्यांनी माना वर काढल्याच नाहीत. परिणामी, डबल खर्च करत काही शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करण्याची वेळ आली.

# राहुरी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना बियाणे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत बियाणे विभागाच्या वतीने नशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील मौजे इन्शी येथे अनुसूचित जमाती (टीएसपी) अनुदानातून आदिवासी शेतकरी बांधवांना खरीप हंगामातील विद्यापीठ संशोधित सोयाबीन पिकाचे फुले किमया व दूर्वा या वाणाचे मोफत बियाणे वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या नेतृत्वाखाली संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी इन्शी गावचे सरपंच बाळासाहेब पवार, पोलीस पाटील तुळशीराम पवार, गोळाखोल गावचे सरपंच प्रभाकर गायकवाड, पोलीस पाटील रामदास पवार, कृषी सहाय्यक अमोल पाटोळे उपस्थित होते.प्रास्ताविक विपणन अधिकारी डॉ. दिलीप ठाकरे यांनी केले. उपस्थित शेतकऱ्यांना डॉ. अविनाश कर्जुले यांनी बीज प्रक्रिया, डॉ. के. सी. गागरे यांनी सोयाबीन वाणांची व डॉ. नितीन दानवले यांनी आधुनिक सोयाबीन लागवड तंत्रज्ञानाची माहिती दिली. यावेळी एकूण ४४३ लाभार्थी शेतकऱ्यांना प्रति एकर क्षेत्राचे २६ किलो प्रति बॅग प्रमाणे एकूण ११ क्विंटल ५१८ किलो सोयाबीन बियाणे वाटप करण्यात आले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. नितीन दानवले यांच्या नेतृत्वाखाली भूषण हंडाळ, संदीप कोकाटे व बियाणे विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी नियोजन केले.

## कत्तलखान्यांबाबत शासनाला खोटी माहिती

# संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करावे : आ. खताळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर शहरातील अवैधरित्या सुरू असणाऱ्या कत्तलखान्याबाबत संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि संगमनेर शहर पोलीस निरीक्षक यांच्या कडून शासनाला देण्यात आलेली सर्व माहिती खोटी आणि दिशाभूल करणारी असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात लक्षवेधी द्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत या अधिकाऱ्यांना त्वरित निलंबित करावे, अशी मागणी गृहमंत्र्यांकडे केली .




संगमनेर शहरात राजेरोसपणे कत्तल खाने चालवली जात आहे. शहर पोलीस त्यांच्या विरोधात थातुरमातुर कारवाई करत आहे. गोवंश हत्याबंदी कायद्यातील तरतूदीतून पळवाट काढून कत्तल खाना चालक-मालकांना वाचवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आत्तापर्यंत संगमनेर पोलिसांनी गोवंश हत्या, आणि कत्तलखाने प्रकरणात एकाही कत्तल खाना चालक मालकावर एमपीडीए नुसार कारवाई केलेली नसतांना देखील तशी कारवाई केली असल्याचे संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि संगमनेर शहर पोलीस निरीक्षक यांनी गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांना सांगत खोटी माहिती देऊन त्यांनी शासनाची दिशाभूल केली आहे. त्यामुळे गृहमंत्र्यांनी संगमनेर उपविभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी आणि शहर पोलीस निरीक्षक यांच्या वर निलंबनाची कारवाई करावी तसेच त्या माहितीची खातरजमा न करणारे अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सक्त ताकीद देण्यात यावी अशीही जोरदार मागणी आमदार खताळ यांनी विधिमंडळात विधानसभा अध्यक्षांकडे केली.

संगमनेर शहरातील शाळा महाविद्याल रुग्णालय व धार्मिकस्थळे, झोपडपट्टी परिसर इत्यादी ठिकाणी अवैध गुटखा, मादक पदार्थ, नशेची गोळी, सिगारेट तसेच अफू, गांजा जवळपासच्या पान टपरीवर खुलेआम विक्री केली जात आहे. मटका, ऑनलाईन जुगाराकडे बेरोजगार तरुणांच्या रांगा दिसून येत आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर अवैध गावठी दारू निर्मिती, वाहतुक करून त्याची राजरोसपणे विक्री केली जात आहे. या माध्यमातून संगमनेरची तरुण पिढी नासवण्याचे काम होत आहे. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे .या सर्व प्रश्नां कडे आमदार अमोल खताळ यांनी सभागृहाचे लक्ष वेधत या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.




# रांधेच्या विठ्ठलवाडीत रविवारी उत्सवी सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : साक्षात पांडुरंगाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या संत श्री बाळोबा महाराज भाकरे यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन स्वयंभू विठ्ठलरुक्मिणी जिथे प्रकट झाली, ती प्रति पंढरपूर म्हणून ओळखली जाणारी पवित्र भूमी असलेल्या रांधे नगरीतील विठ्ठलवाडी येथे रविवार दि. ६ रोजी आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारकरी भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाचे आयोजन करण्यात आले आहे.स्वयंभू विठ्ठलरुक्मिणी देवस्थान, सेनापती बापट सेवा मंडळ आणि समस्थ रांधे, विठ्ठलवाडीकर यांच्या संयुक्त विद्यमाने देवयानी आषाढी एकादशी उत्सव सोहळा रविवार दि. ६ रोजी मोठ्या उत्साहात सम्पन्न होणार असून यानिमित्त पहाटे ४.३० वाजता अभिषेक व महापूजा, काकड आरती सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत विठ्ठलवाडी ते रांधे गावठाण ते विठ्ठलवाडी पायी दिंडी सोहळा, दुपारी १ ते ३ वाजता ठाणे च्या किसन नगर येथील ज्ञानेश्वरी महिला भजनी मंडळ यांचे सुश्राव्य भजन, दुपारी ३ ते ५ वाजता गावोगावाहून येणाऱ्या दिंड्यांचं स्वागत, संध्याकाळी ५ ते ६ वाजता हभप उत्तम महाराज साबळे यांचे प्रवचन, ६ ते ७ वाजता हरिपाठ, ७ ते ९ वाजता झी टॉकीज फेम, हभप कीर्तन रत्न अर्चना दीदी साळुंके, सगर यांचे हरी कीर्तन, रात्री ९ वाजेपर्यंत एकादशी फराळ वाटप करण्यात येणार आहे.या उत्सव सोहळ्यात सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठ्ठल नाम स्मरण करून आनंदात सहभागी होण्याचे आवाहन स्वयंभू विठ्ठल रुक्मिणी देवस्थान ट्रस्ट,सेनापती बापट सेवा मंडळ आणि समस्थ ग्रामस्थ रांधे विठ्ठलवाडीकर यांनी केले आहे .

# श्रीरामपूर येथे घरेलू महिला कामगार कार्यशाळा संपन्न



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथे घरेलू महिला कामगार कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस शहरातील तसेच परिसरातील घरेलू महिला कामगार महिलांची उपस्थित होते.

घरकामगार हे समाजातील एका मोठ्या उत्पादक वर्गाला सेवा पुरवतात. या प्रक्रीयेत त्यांना जगण्यासाठी उत्पन्न मिळते. असंघटित क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा वर्ग असलेल्या घरकामगार महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी प्राध्यापक संभाजी पवार यांच्या युवाग्राम विकास संस्था गेल्या दोन वर्षापासून सातत्याने मजबुतीने कार्यरत आहे. त्यांचा कामाला आमचे सहकार्य व पाठबळ राहील, असे प्रतिपादन स्नेहालय संस्थेच्या बालभवन प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख यांनी केले. युवाग्राम विकास संस्था व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने घरेलू महिला कामगार संघटना कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राजेंद्र वाडेकर होते. याप्रसंगी युवाग्राम संस्थेचे अध्यक्ष संभाजी पवार, संचालक फिरोज शेख, अमोल सोनवणे, शायिस्ता शेख, अनिता शेलार, आदित्य पवार आदी मान्यवर उपस्थित होते. युवाग्रामचे अध्यक्ष संभाजी पवार म्हणाले, घरेलू कामगार महिलांमध्ये एकजूट नसल्यामुळे ते आपल्या हक्काविषयी आणि अधिकाराविषयी जागृत नाही. त्यामुळे ज्यांचे प्रश्न त्यांचे नेतृत्व आणि त्यांचाच आवाज या मुद्याला घेऊन संघटनात्मक बांधणी केली तर प्रश्न सुटण्यास मदत होईल. स्वागत शायिस्ता शेख, तर आभार अनिता शेलार यांनी मानले. सूत्रसंचलन अमोल सोनवणे यांनी केले.

# शहरातील ४४ रिक्षांवर वाहतूक शाखेची कारवाई

## विद्यार्थ्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या व मुदत संपलेल्या रिक्षांचा समावेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील शालेय विद्यार्थ्यांची आरटीओ परवानगीशिवाय होणारी अवैध वाहतूक आणि स्क्रॅपमध्ये टाकण्याची आवश्यकता असलेल्या मुदत संपलेल्या रिक्षांवर शहर वाहतूक शाखेने कारवाई केली आहे. या विशेष मोहिमेत एकूण ४४ रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे.

वाहतूक शाखेच्या माहितीनुसार, शहरातील विविध शाळांजवळ व रस्त्यांवर गस्त घालून तपासणी केली असता तब्बल १२ रिक्षा अवैधपणे विद्यार्थ्यांची वाहतूक करत असल्याचे आढळून आले. या वाहनचालकांकडे आरटीओ विभागाकडून आवश्यक शालेय वाहन परवाना (स्कूल व्हेईकल परमिट) नव्हता. त्यामुळे संबंधित वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांना न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे. ही कारवाई शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय गवळी, उपनिरीक्षक रवींद्र घायतडक, उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, अंमलदार मन्सुर सय्यद, रियाज इनामदार, अन्सार शेख, सोपान गिऱ्हे, संतोष खेडकर, मुस्ताक शेख, जावेद शेख, मधुकर ससे, राहुल काळे, रामदास शेटे, छगन दहिफळे यांच्या पथकाने केली.

### मुदस संपलेल्या रिक्षांवरही कारवाई

शहरात मोठ्या प्रमाणावर मुदत संपलेल्या व वापरण्यायोग्य नसलेल्या ३२ रिक्षा देखील वाहतुकीस वापरल्या जात असल्याचे निदर्शनास आले. अशा रिक्षांवर कारवाई करत शहर वाहतूक शाखेने त्या तात्काळ डिटेन केल्या असून, पुढील कार्यवाहीसाठी आरटीओ विभागाकडे पाठवण्यात आले आहेत.

# प्रांताधिकाऱ्यांनी घेतली राजकीय पदाधिकाऱ्यांची बैठक

## नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत केले मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी नुकतीच तालुक्यातील राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

या बैठकीत निवडणूक प्रक्रीया पारदर्शक, निर्भय आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीसाठी तहसिलदार मिलिंदकुमार वाघ, निवासी नायब तहसिलदार राजेश पऊळ, निवडणूक नायब तहसिलदार



हेमलता वाकडे, उपमुख्याधिकारी महेंद्र तापकिरे, महसूल सहायक उत्तम रासकर, ओम खुपसे, संदीप पाळंदे, नगरपरिषदेचे लिपिक अरुण लांडे उपस्थित होते.यावेळी निवडणूक प्रक्रीया ही लोकशाहीचा पाया आहे. सर्वपक्षांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करून निवडणूक शांततापूर्ण आणि निष्पक्षपणे पार पाडावी, असे सावंत पाटील यांनी सांगितले. त्यांनी मतदान केंद्रांवर गोंधळ टाळण्यासाठी आणि मतदारांना त्रास होऊ नये, यासाठी पक्षांनी बुथ लेवल एजंटची नेमणूक करावी, असे आवाहन केले. १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर २०२५ या तारखेस १८ वय वर्ष पूर्ण होणारे व झालेल्या व्यक्तींना मतदार नोंदणी करता येणार आहे. प्रतिष्टीत मतदार, आजी, माजी खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, वकील, इंजिनियर, दिव्यांग आदी मतदारांची नावे मतदार यादीत तपासाकामी काही अडचण असल्यास तत्काळ निवडणूक शाखेत संपर्क साधण्याचे आवाहन प्रांताधिकारी किरण सावंत यांनी केले.या बैठकीला काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि इतर स्थानिक पक्ष व आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रीया ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नाही, तर राष्ट्रीय कर्तव्य आहे. सर्वांनी एकत्र येऊन ही प्रक्रीया यशस्वी करुया. मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा अनुभव आणि प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यशस्वी पार पाडू.

**- मिलिंदकुमार वाघ, तहसिलदार**




# कॅलिडोस्कोप

## पावसाळ्यातली भटकंती

सध्या पावसामुळे वातावरण अगदी थंड आणि रोमँटिक झाले आहे. शनिवार-रविवार निसर्गप्रेमी बाहेर फिरायला निघतात. पावसाळ्यात प्रवास करण्याची एक वेगळीच मजा असते. महाराष्ट्र अनेक प्राचीन किल्ले, राजवाडे, लेणी, मंदिरे यांसाठी ओळखला जातो त्याचप्रमाणे नैसर्गिक पर्यटन स्थळांसाठीही जगभरात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राविषयी असे म्हटले जाते की, येथे असलेल्या काही ठिकाणांचे सौंदर्य पावसाळ्यात इतके आकर्षित करते, की पर्यटक देशाच्या कानाकोपऱ्यातून भेटीसाठी येतात. महाराष्ट्रातील काही धबधब्यांच्या ठिकाणी गेलात, तर स्वर्गीय सुख काय असते, ते अनुभवायला मिळणार आहे.



महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर हिलस्टेशन येथील सर्वात सुंदर आणि मनमोहक धबधबा म्हणजे 'चायनामन फॉल'. पावसाळ्यात त्याचे सौंदर्य अनुभवण्यासारखे असते आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक येथे येतात. या धबधब्यात ५०० फूट उंचीवरून पाणी जमिनीवर कोसळते तेव्हा आजूबाजूचे दृश्य केवळ कौतुक करण्यासारखे असते. धबधब्याच्या सभोवतालची हिरवळ पावसाळ्यात पर्यटकांना आकर्षित करते.

महाराष्ट्रातील कोणत्याही भव्य आणि मनमोहक हिल स्टेशनला भेट द्यायची झाल्यास माथेरान हे सर्वोत्तम ठिकाण मानले जाते. माथेरान सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेच, तसेच तिथले काही धबधबेही प्रसिद्ध आहे. तिथे तुम्ही पांडवकडा धबधबा, माडप धबधबा, दोधनी धबधबा आणि आनंदवाडी धबधबा पाहू शकता.

ठोसेघर हा सुंदर धबधबा महाराष्ट्रातील सर्वात उंच धबधब्यांपैकी एक मानला जातो. हे ठिकाण सातारा शहरापासून २० किलोमीटर अंतरावर कोकण विभागाच्या काठावर आहे. इथे हजार फुटांपेक्षा जास्त उंचीवरून पाणी जमिनीवर पडते. ते पाहण्यात वेगळा आनंद आहे. सॉलिडघर धबधबा रोमँटिक ठिकाण आहे. अनेक जोडपी येथे भेट देण्यासाठी येतात. या धबधब्याभोवतीचा परिसर ट्रेकिंगसाठीही खूप लोकप्रिय आहे.

## रणकपूरचं अनोखं जैन मंदिर

भारतात हजारो मंदिरं आहेत. त्यांच्याशी संबंधित अनेक पौराणिक कथा तसंच त्यांची अनेक वैशिष्ट्यंही आहेत. स्थापत्यकला, नक्षीकाम, रचनेमुळे लोकप्रिय ठरलेली मंदिरं पाहण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी होत असते. असंच एक संगमरवरी मंदिर राजस्थानातल्या उदयपूरमध्ये वसलंय.

जैन धर्मीयांचं श्रद्धास्थान असणारं हे मंदिर १५०० खांबांवर उभं असून उदयपूरपासून १०० किलोमीटरवर असणाऱ्या रणकपूरचं हे एक खास वैशिष्ट्य मानलं जातं. जैनांच्या पाच प्रमुख स्थानांमध्ये याचा समावेश असून इथलं सौंदर्य नजरेत भरण्यासारखं आहे. मंदिराच्या खांबांवर सुंदर नक्षीकाम करण्यात आलं आहे. संगमरवरातून साकारलेल्या या मंदिराच्या दारांच्या रचनेत कलात्मकता ठासून भरली आहे. गाभाऱ्यात तीर्थंकर आदिनाथाच्या संगमरवरात घडवलेल्या चार भव्य मूर्ती आहेत. पंधराव्या शतकात राणा कुंभाच्या राजवटीदरम्यान मंदिर बांधण्यात आलं. मंदिरात बरीच तळघरं आहेत.


संकटकाळी मूर्ती लपवता याव्या या हेतूने इथल्या तळघरात त्या लपवण्याची सोय केलेली दिसते. असं हे मंदिर आश्चर्यच म्हटलं पाहिजे.




## लाखो रुपयांची नोकरी सोडून बनली हेल्पर!

प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते की चांगले पैसे मिळतील, अशी नोकरी असावी. जेणेकरून स्वत:साठी आणि त्याच्या कुटुंबासाठी आरामदायी जीवन जगू शकू. पण कोणी लाखोंची नोकरी सोडून पेस्ट्री हेल्पर म्हणून काम करणे, हे ऐकायला थोडं विचित्र वाटेल पण हे खरे आहे.

गुगलसारख्या कंपनीत काम करणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. गुगलची मुलाखत क्रॅक करणे सोपे नाही. काम आणि पगाराच्या बाबतीत गुगल इतर टेक कंपन्यांपेक्षा पुढे आहे. येथे फ्रेशर्सना करोडोंचे पॅकेजही मिळते. पण केवळ छंदासाठी ही नोकरी सोडावी का? एका महिलेला पेस्ट्री बनवण्याची आवड असल्याने तिने ८३ लाख रुपयांची गुगल मधल्या नोकरीचा राजीनामा दिला. व्हॅल्कोर्ट ही गुगलमध्ये सॉफ्टवेअर इंजिनियर होती; परंतु २०२२ मध्ये तिने नोकरी सोडून फ्रान्सला जाण्याचा विचार केला. त्या वेळी ती फक्त ३० वर्षांची होती. तिने तिचा छंद जोपासण्यासाठी अमेरिका सोडून फ्रान्समध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.



व्हॅल्कोर्टने सांगितले, की मी अमेरिकेपेक्षा येथे अधिक आनंदी आहे. मी इथे फक्त २५ लाख रुपये कमवत असले, तरी खूप आनंदी आहे. या कमाईने मी माझे सर्व खर्च सहज भागवते. तिला तिची नोकरी आवडते. तिला फ्रेंच वर्क कल्चरदेखील आवडते.



## मेटिंगशिवाय गर्भधारणा!

गर्भधारणेसाठी शुक्राणू आणि स्त्रीबीज या दोहोंची गरज असते. मादी मेटिंगशिवाय गर्भार राहू शकत नाही. आयव्हीएफ तंत्रज्ञानातही शुक्राणू आणि स्त्रीबीजाचं कृत्रिम पद्धतीने मीलन घडवून आणलं जातं. पण एका विशिष्ट प्रजातीच्या सापाची मादी मेटिंगशिवाय गरोदर राहू शकते. शास्त्रज्ञांनी उत्तर अमेरिकेतल्या पीट वायपर आणि कनेक्टिकटमध्ये आढळणाऱ्या कॉपरहेड सापांचा बारकाईने अभ्यास करून काही निष्कर्ष काढले. यानिमित्ताने 'बोआ कॉंस्ट्रिक्टर' प्रजातीच्या सापाच्या मादीतली अलैंगिक प्रजननाची क्षमता जगापुढे आली आहे. नॉर्थ कॅरोलिना स्टेट विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. या सापाच्या बऱ्याच मादी पिलांच्या जन्मात नर सापाचं कोणतंही योगदान नसल्याची बाब त्यांनी हेरली. अलैंगिक प्रजननाला शास्त्रीय भाषेत 'फॅकल्टेटिव्ह पार्थेनोजेनेसिस' असं म्हणतात. या तंत्रज्ञानात मादीच्या गर्भाशयात शुक्राणूंशिवाय अंडी किंवा गर्भ राहतो. सापांच्या या प्रजातीत आढळणारा हा गुणधर्म निसर्गाचा चमत्कारच म्हटला पाहिजे. ही अत्यंत दुर्मीळ बाब असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. नर सर्पांमध्ये दोन झेड क्रोमोसोम्स असतात तर मादी सर्पात एक झेड आणि एक डब्ल्यू झेड क्रोमोसोम आढळतो. असं असताना अलैंगिक प्रजनानाद्वारे जन्मलेल्या मादी सापांमध्ये डब्ल्यू डब्ल्यू क्रोमोसोम आढळले आहेत. या पद्धतीने जन्मलेला मादी सापांचा रंग आईसारखा असतो. त्यांचे लैंगिक क्रोमोसोम्सही नैसर्गिक प्रजननाद्वारे जन्मलेल्या सापांपेक्षा भिन्न असतात. 'बोआ कॉंस्ट्रिक्टर' ही प्रजाती मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आढळते. इतर सापांच्या तुलनेत त्यांची पचनशक्ती बरीच जास्त असते. या सर्पाची मादी एका वेळी ६० पिलांना जन्म देऊ शकते.

## जिन्यासाठी मोजले १.३२ कोटी

पॅरिसमध्ये झालेल्या लिलावादरम्यान एका व्यक्तीने १४ फूट उंचीचा जिना खरेदी करण्यासाठी तब्बल १.३२ कोटी रुपये मोजल्याची घटना चर्चेत राहिली. एवढी बोली लागली म्हणजे त्या जिन्यात काही खास असणार हे नक्की! अर्थातच हा जिना साधासुधा नाही. पॅरिसची शान म्हणवल्या जाणाऱ्या आणि जागतिक आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या 'आयफेल टॉवर'चा हा जिना आहे. म्हणूनच इतकी तगडी किंमत मोजून तो खरेदी करण्यात आला. भारतीय चलनात तब्बल १.३२ कोटी रुपये मोजून एका अरबाने ही मौल्यवान वस्तू विकत घेतली. हा जिना आयफेल टॉवरच्या दुसऱ्या अणि तिसऱ्या मजल्याचा भाग होता. लिलावात त्याला इतकी चांगली किंमत मिळेल, अशी आयोजकांनाही अपेक्षा नव्हती. पण या व्यवहाराने ते खुश आहेत. अर्थात असं पहिल्यांदाच घडलेलं नाही. २०१६ मध्ये एका आशियाई इसमाने टॉवरच्या जिन्याचा एक भाग अशीच भरभक्कम रक्कम देऊन खरेदी केला होता. त्याला अवघ्या १४ पायऱ्या होत्या. पण एका महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वास्तूची आठवण म्हणून एवढी बोली लागली होती. ३२४ मीटर उंच



आयफेल टॉवर फ्रेंच इंजिनियर गुस्ताव एलिल यांच्या संकल्पनेतून साकारला. वरच्या मजल्यांवर जाण्यासाठी पूर्वी या जिन्यांचाच वापर होत असे. १९८३ मध्ये तिथे लिफ्ट बसवण्यात आली. तेव्हापासून जिन्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालं. तब्बल ४१ वर्षं जगातली सर्वात उंच इमारत अशी आयफेल टॉवरची ओळख होती.

## यकृताविषयी थोडंसं...

यकृत हा मानवी शरीरातला अत्यंत महत्त्वाचा अवयव. त्याच्या कार्यावर आपलं आरोग्य अवलंबून असतं. त्वचेनंतर शरीरातला दुसऱ्या क्रमांकाचा मोठा अवयव म्हणजे यकृत. पाठीचा कणा असणाऱ्या प्रत्येक सजीवाच्या शरीरात यकृत असतं. हा अवयव चयापचय क्रियेवर प्रभाव टाकतो. चरबी जाळून वजन कमी करण्यात यकृताचा मोठा वाटा असतो. ही सर्वात मोठी ग्रंथी आहे. मानवी शरीरातल्या यकृताचं वजन १.३ ते १.६ किलोपर्यंत असतं. शरीरातली विषद्रव्यं काढून टाकणं हे त्याचं प्रमुख काम. पुन्हा वाढ होऊ शकणारा तो एकमेव अवयव आहे. यकृत पुनर्वाढीसाठी २५ टक्के मूळ टिश्यूंची गरज लागते. प्लाझ्मा ग्लुकोज आणि अमोनियाची पातळी नियंत्रणात ठेवण्याचं काम यकृत करतं. त्यामुळे मेंदूचं कार्य सुरळीत सुरू ठेवायचं असेल तर हा अवयव निरोगी हवा. ए,डी,ई,के आणि बी १२ ही जीवनसत्त्वं यकृतात साठवली जातात. ते स्वतंत्रपणे प्रथिनांची निर्मिती करतं. औषधं शरीरापर्यंत पोहोचवण्याचं कामही याच अवयवाकडे असतं. आपण घेतो ती औषधं थेट शरीराला मिळत नाहीत. आधी ती यकृतात जातात. यकृत विशिष्ट घटकांमध्ये त्याचं रूपांतर करतं आणि मगच ती शरीरात शोषली जातात. एका अभ्यासानुसार यकृत ५०० प्रकारची कार्य करू शकतं. त्यामुळे हा अवयव फिट असेल तर आपला फिटनेस टिकू शकतो हे कायम लक्षात ठेवा.



## झोपेत तीन लाखांची खरेदी

खरेदी म्हणजे महिलांचा आवडीचा विषय... मग ती ऑनलाईन असो किंवा ऑफलाईन. तसं पाहायला गेलं तर पुरुषांपेक्षा महिलांमध्ये खरेदीची क्रेझ अधिक असते. याच पार्श्वभूमीवर ब्रिटनमधून एक धक्कादायक बातमी समोर आली. इंग्लंडमध्ये राहणाऱ्या ४२ वर्षीय महिलेला झोपेचा दुर्मिळ आजार झाला आहे. तिने झोपेत चक्क तीन लाख रुपये खर्च केले आहेत. इंटरनेटच्या युगात ऑनलाईन शॉपिंगचे अनेकांना वेड असते. लोकांना पाहिजे त्या वस्तू, हव्या त्या किंमतीत आणि विविध व्हरायटीमध्ये उपलब्ध असतात. या वस्तू घरपोचदेखील मिळतात. त्यामुळे लोक बाजारात जाण्यापेक्षा ऑनलाईन खरेदीला अधिक महत्त्व देताना दिसत आहेत.

कोणत्याही प्रकारच्या खरेदीसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी खुलेपणाने खरेदी करता येते. पण कधी झोपेतील खरेदीबाबत ऐकलंय का?



इंग्लंडमधील केली नाइप्स या महिलेला झोपेचा दुर्मिळ आजार आहे. त्यामुळे ती झोपेतच शॉपिंग करते. अलीकडेच तिने झोपेत तीन लाख रुपयांची खरेदी केली. केली दिवसाच नव्हे, तर रात्रीही शॉपिंग ॲप्स स्क्रोल करत असे. परिणामी, तिने झोपताना तीन हजार पौंड म्हणजेच सुमारे तीन लाख रुपयांची खरेदी केली.

या महिलेला पॅरासोम्निया हा दुर्मिळ आजार आहे. अशा स्थितीत रुग्णाला काहीच कळत नाही. या आजारात लोक चालतात, बडबड करतात, खातात-पितात तर काही जण विचित्र कृत्यही करतात. तिने झोपेत ऑनलाइन वेबसाइटवरून बास्केटबॉल युनिट, फ्रीज टेबल, टॉफी, पुस्तके, मीठ, पेंट इत्यादीसारख्या अनेक गोष्टी ऑर्डर केल्या.

डॉक्टरांनी सांगितले, की या आजारात व्यक्ती झोपताना विचित्र क्रिया करू लागते. तपासणी केल्यावर असे आढळून आले की केलीला केवळ पॅरासोमनियाच नाही तर स्लीप एपनियादेखील आहे. हा आजार माणूस झोपेत असताना मेंदूला अर्धवट जागे करण्यास भाग पाडतो. तिने झोपेत सायबर गुन्हेगारांबरोबर बरीच माहिती शेअर केली आहे. त्यांनी तिच्या बँक खात्यातून पैसे काढण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे तिला तिची अनेक कार्डे ब्लॉक करावी लागली आहेत.

## अमेरिकेतही पाणीपुरीची मोहिनी!

भारतातील लोक खाण्यापिण्याच्या बाबतीत खूप शौकीन आहेत. भारतामध्ये स्ट्रीट फूड फार लोकप्रिय आहे. त्यातलाच एक पदार्थ म्हणजे पाणीपुरी लोक चवीने खातात. भारतातील अनेक शहरांमध्ये पाणीपुरी प्रसिद्ध आहेच. पण आता परदेशातही पाणीपुरी लोकप्रिय झाली आहे. परदेशी लोकांनाही हे भारतीय स्ट्रीट फूड आवडते.

अमेरिकेतील मिनियापोलिस शहरामधल्या एका दुकानासमोरील रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर लोक पाणीपुरी खाताना दिसले. त्यात बहुतांश लोक अमेरिकन, तर काही भारतीय वंशाचे लोकही होते. अमेरिकन लोकांना पाणीपुरी खूप आवडली असल्याचे त्यांच्या प्रतिक्रियांवरून समजले. 'मी पहिल्यांदाच पाणीपुरी खात आहे. चवीला खूप छान आहे.' 'ही पाणीपुरी नंबर वन आहे.' अशा ग्राहकांच्या प्रतिक्रिया होत्या.



## वर्ण उजळवणारी आग

सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळे फंडे अनुसरले जातात. या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये सौंदर्य जपण्यासाठी वेगवेगळी तंत्र अवलंबली जातात. शस्त्रक्रिया करून बसकं नाक सरळ केलं जातं. चेहऱ्यावर पडू पाहणाऱ्या सुरकुत्या थोपवण्यासाठी नानाविध थेरपींचा अवलंब होतो. आधुनिक तंत्र आणि उपचारामुळे सावळ्या मुलीही गोऱ्या दिसू लागतात. थोडक्यात काय, आता सौंदर्यक्षेत्रात अशक्य असं काहीही राहिलेलं नाही. फॅशनच्या जगात कधी कुठला ट्रेंड येईल सांगता येत नाही. व्हिएतनाममध्ये 'फायर ट्रिटमेंट' किंवा 'फायर थेरपी'द्वारे सौंदर्य खुलवण्याचा भन्नाट प्रयोग सुरू आहे. आपण आगीपासून चार हात लांबच राहतो. पण हीच आग वर्ण उजळवू शकते यावर आपल्याला विश्वास ठेवावा लागेल. व्हिएतनाममधल्या पुरूष आणि महिलांना सुंदर दिसण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं. इथली सलून्स आणि स्पा फायर थेरपीद्वारे त्यांना सुंदर बनवण्यास सज्ज आहेत. या उपचारात अंगावर टॉवेल टाकून त्याला आग लावण्यात येते. ३० सेकंद ते एक मिनिटापर्यंत हा प्रकार सुरू राहतो. या प्रकारामुळे सौंदर्यवृद्धी होतेच शिवाय निद्रानाश, डोकेदुखी, अंगदुखी यासारख्या समस्याही दूर होत असल्याचा दावा आहे. या थेरपीदरम्यान योग्य ती काळजी घेतली जाते असं तज्ज्ञ सांगतात. फायर थेरपीमुळे सुरकुत्यांचं प्रमाण कमी होत असल्याचं सांगितलं जातं. चीनमध्येही या तंत्राची चलती आहे. तिथे याला 'फ्लेम फेशियल' असं म्हणतात. ही थेरपी देताना अंगावर टाकल्या जाणाऱ्या टॉवेलवर अल्कोहोल शिंपडतात. प्रशिक्षित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया होत असल्यामुळे काळजीचं कारण नसल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे कधी व्हिएतनामला भेट दिली तर फायर थेरपी तुमच्या बकेट लिस्टमध्ये असू द्या.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11